शनिवार । २६ ऑक्टोबर १९७४
एक रुपया

# माणूस

‘दिवाळी अंकासाठी लेख तयार करण्यास कालपासून सुरवात केली. कालच विश्वास विनायक सावरकर ( वीर सावरकरांचे सुपुत्र ) ह्यांची एक तास मुलाखत घेतली. आता परत दोन बैठकी करायचे ठरले आहे. शीर्षक....

## सावरकरांचा मुलगा
## किंवा
## सावरकरांच्या घरातला दिवा

असं काही तरी असेल. लेख अतिशय Interesting होईल यात शंकाच नाही. लेख माणूसच्या दिवाळी अंकाची ४।५ पाने होईल. लेखाच्या Quality बद्दल काळजी नसावी. खूप लोक वाचतील. कारण विषय अभिनव आणि जिव्हाळ्याचा आहे. —रवींद्र पिंगे

**माणूस दिवाळी अंकाचे आणखी काही मानकरी**

- विजय तेंडुलकर
- विद्याधर पुंडलीक
- पुष्पा भावे
- अरुण साधू
- छाया दातार
- रत्नाकर मतकरी
- नारायण धारप
- दि. बा. मोकाशी
- अशोक जैन
- वि. ग. कानिटकर
- रंगा मराठे
- निशिकांत मिरजकर
- ज्योत्स्ना देवधर
- सुमती देवस्थळे
- भाऊ पाध्ये
- रा. चिं. ढेरे
- अनंत भावे
- व. कृ. जोशी

## शिवाय

**महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी लिहिलेला एका निराळ्याच विषयावरचा एक निराळाच लेख--**

## माझ्या ओळखीचे स्वामी स्वरूपानंद







---

प्रिय रसिक वाचक, स. न.

गेले दीड वर्ष तुम्ही तुमच्या सहनशक्तींला ताण देऊन कधीही न हसता मुकाटचानी माझी हास्यचित्रं पाहिलीत, वाचलीत त्याबद्दल अत्यंत आभारी आहे. केवळ त्यातून तुमची सुटका करण्यासाठी यापुढे दोन महिने मीं हास्यचित्रं काढणार नाही. वा ! हे वाचून हसलात ना ? म्हणजे तुम्हाला खरोखरच सुट्टी हवी होती. Wish you Happy Holiday !

—आपला श्याम जोशी


आता भारताने अणु बॉम्बचे ऐवजी चपलाच बनवाव्यात ! (शांततेसाठी)
केरळच्या विधानसभेत चपलांचे युद्ध


सरकार यापुढे पांचटक्के स्निग्धाशावरून सात टक्के वालं दुध देणार म्हणजे आमची पिळवणूकच होणार की!


रॉंग नंबर लागण्याची कम्माल झाली बाई! हॅलो तुम्ही कोण बोलताय? कोण? भूत्तो?

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २६ ऑक्टोबर | अंक : बाविसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# मराठी माणूस : लुटालूट, परप्रांती जाणे वगैरे

## सप्रेम नमस्कार....

¤ १२ ऑक्टोबरच्या अंकातील डॉ. बाकरे (जळगाव) यांचे बोलके पत्र वाचल्यावर लगेच लिहावेसे वाटले म्हणून ह्या पत्राचे प्रयोजन. डॉ. महोदयानी मराठी माणसाचे गुण परखडपणे लिहिले आहेत पण ती सत्य परिस्थिती आहे ह्याकडे डोळेझाक करून चालणार नाही.

शास्त्र, शिस्त अन जिद्द ह्या त्रयीवर ज्यांचा विश्वास आहे अशा सुशिक्षित तरुणांना मी ह्या आदिवासी भागात काम करतो तेथे देखील त्यांची तयारी असल्यास रु. १२५-१५० पर्यंत दरमहा व शेतीवर रहायला जागा अशी व्यवस्था होऊ शकेल.

मृणाल ब्रिगेडसारख्या लाटणेधारी महिला संघटनादेखील अन्न-धान्याच्या वाटपातील सावळ्यागोंधळाकडे शासनाचे लक्ष वेधून त्याला वठणीवर आणण्यास सज्ज असतात पण त्या शहरात ! ह्या आदिवासी भागात प्रथम रेशन कार्डेच नाहीत, असल्यास त्यावर धान्य नाही. कार्डावर साखर घेणे त्याला परवडतच नाही पण त्याच्या वाट्याला येण्यापूर्वीच ती गायब होते. अशी एक ना दोन कितीतरी सुशिक्षित माणसाने लक्ष देऊन करायची कामे आहेत. त्यातून अधिक नानाविध अनेकानेक कामे सहज उपलब्ध होतील. बराच सविस्तर तपशील देता येईल पण हे ठिकाण नव्हे. तेव्हा आपणामार्फत मी अगर माझी संस्था काही करू शकलो तर पहावे.

**–राम पाटणकर**

११ ऑक्टोबर, ७४ — गोधाम, सूत्रकार, जि. ठाणे.

¤ दि. १२ ऑक्टोबर ७४ च्या माणूसमध्ये छापलेले डॉ. बाकरे जळगाव ह्यांचे पत्र वाचले.

त्या पत्रातून त्यांची भावना पटली व ज्या प्रामाणिकपणाने त्यांनी त्यांना त्यांच्या उपायांची मर्यादा माहीत असल्याचे लिहिले ते अत्यंत योग्य आहे. ह्या प्रामाणिकपणाचाच अभाव कित्येक गरिबांच्या सहानुभूतीदारात, विचारवंतामध्ये प्रकर्षाने जाणवतो. त्या पत्रात सुचवलेल्या तीन उपायांपेक्षाही (लुटालूट, परप्रांती जाणे, सहन करणे) एक चौथा उपाय अस्तित्वात आहे. तो म्हणजे,

पीडित लोकांची त्या शिकलेल्या मुलांनी संघटना करणे व या समाज चौकटीतच शक्य तेवढा न्याय मिळविण्याचा संघटित प्रयत्न करीत ही चौकट तोडण्यासाठी क्रांतिकारक चळवळ उभारण्याचा प्रयत्न करणे

हा उपाय आम्हाला सर्वांत योग्य व निर्णायक वाटतो. अर्थात म्हणजे नक्की काय करायचे ह्याच्या विस्तारात येथे जाता येणे शक्य नाही.

त्याच पत्रातील अनुभवावरून त्यांनी काही निष्कर्ष काढले आहेत ते मात्र अशास्त्रीय वाटतात. अनुभव आम्ही नाकारीत नाही, मात्र अनुभवाकडे बघण्याचा दृष्टिकोन नाकारतो. मराठी मुलुखात मराठी माणसापेक्षा बाहेरचा माणूस येऊन कष्ट अधिक करतो, ओव्हरटाईम करतो पण मराठी माणूस करीत नाही. खानदेशी मजुराला कमी कामाला जास्त मिळते त्यामुळे येथील मजूर आळशी आहे वगैरे...

गुजराथमध्ये जाऊन बघितले तर गुजराथी मालक म्हणतो की, गुजराथी मजुरापेक्षा खानदेशी मजूर अधिक कष्ट करतात, ओव्हर टाईम करतात. (थोडक्यात कमी मजुरीत काम करतात) गुजराथ-मधून खानदेशी मजुरांना हाकलण्याची चळवळ म्हणूनच सुरू झाली आहे त्याचे कारणच हे आहे. हे बाहेरचे मजूर कमी मजुरीत काम करतात त्यामुळेच पहिल्या उदाहरणात मराठी आळशी, मलबारी कष्टाळू हा निष्कर्ष चुकीचा आहे. मलबारी मजूर कमी मजुरीत काम करीत असले पाहिजेत. ओव्हर टाईम, पीस वर्क हे शोषणाचे उत्कृष्ट मार्ग आहेत. वरील अनुभवाचा योग्य निष्कर्ष बाहेरचे मजूर निकृष्ट मजुरीत, निकृष्ट रहाण्याच्या जागेत रहाण्यास, काम करण्यास तयार असतात व ते मालकाच्या फायद्याचे असते असा आहे.

ह्यावर वाचकांनी जरूर विचार करावा.

**–विजय कान्हेरे, शहादा.**

१२ ऑक्टोबर, ७४ — (कार्यकर्त्यांच्या चर्चेवरून)

¤ आपल्या 'माणूस'च्या दि. १२ ऑक्टोबरच्या अंकात आलेले डॉ. बाकरे, जळगाव यांचे पत्र वाचले. आपण ते पत्र प्रसिद्ध केले याबद्दल आपले अभिनंदन.

आपण महाराष्ट्रीयन लोक दुसऱ्यांचे दोष काढण्यात तत्पर व पटाईत असतो. पण आपल्यात असलेले दोष मात्र सुधारू शकत नाही. आपल्याला मिळालेल्या नोकरीबाबत आपण उदासीन तर असतोच वर स्वतःला दोष न देता दुसऱ्याला दोषी ठरविण्यात धन्यता मानतो. मागील वर्षी आमच्याकडे (या शाखेत) एका बी. ए. एल एल. बी. महाराष्ट्रीयनाची नेमणूक झाली होतो. पण आत्मविश्वासाअभावी त्याने ती तीन महिन्यात गमावली. साधे खाणावळीतले इथले जेवण त्याला जाईना म्हणून त्याने एकट्याला राहता येण्यासारखी खोली असतानाही पालकाना बोलावून घेतले व पालकही लाडक्या लेकाच्या काळजीने धावत आले ही आपली पात्रता.

मुळात आपण महाराष्ट्रीय लोक एकमेकासाठी धडपडत नाही. आणि काहीसाठी काही केले तर ते पुढे त्याची किंमत ठेवीत नाहीत. परप्रांतीयानी सर्व जागा काबीज केल्या म्हणून रडण्यापेक्षा आपण त्या जागेवर हक्क सागून आपणही काही कमी नाही हे दाखवून द्यायला पाहिजे. उपरे लोक म्हणून त्याची हेटाळणी करण्यापेक्षा आपल्यात काय कमी आहे हे पाहिल्यास जास्त चागले होईल.

डॉ. बाकरेंनी सुचविलेल्या पर्यायांपैकी पहिला लुटण्याचा प्रकार आपल्या प्रकृतीला मानवण्यासारखाही नाही व तेवढया तोला-मोलाची संघटनाही नाही आहे. दुसऱ्या पर्यायाबाबत एवढेच म्हणता येईल की, परभाषा शिकण्याची व परप्रातात जाऊन काम करून लोकप्रिय होण्याची जिद्दही आपणात नसल्यामुळे (हे दुर्दैवी सत्य आहे.) तो मार्गही खुटला आहे. राहता राहिला तिसरा मार्ग व तोच स्वीकारण्यात आला आहे यावर उपाय म्हणजे सघटितरित्या आपण आपल्याच राज्यात काय करू शकतो याची चाचपणी व मनासारखे काम मिळेपर्यंत मिळेल ते काम करण्याची तयारी पण यासाठी मन घट्ट करावे लागेल. कारण या भयानक बेकारीच्या काळात कदाचित त्यालाच उशीर होईल.

तुकारामाची परपरा सागणाऱ्या महाराष्ट्रीयानी 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' ही उक्ती विसरू नये. एवढेच सुचवावेसे वाटते.

**हेमकिरण बाकरे,**

१६ ऑक्टोबर, ७४ — बगलोर

□ १९ ऑक्टोबर ७४ च्या अकातील 'हिमालयाच्या अलीकडे आणि पलीकडे' ही कम्युनिस्टाच्या आपल्याकडील अपयशाची कारणमीमांसा वाचली.

आपण म्हणता त्याप्रमाणे नेतृत्वातील गुणावगुण, कमतरता, इ. कारणे तर या मागे जरूर आहेतच. पण मला दिसणारी आणखी एक शक्यता, कारण ते म्हणजे कॉंग्रेस. स्वातत्र्योत्तर काळातील (विशेषतः अलीकडच्या पाचपधरा वर्षांतील) कॉंग्रेसची अधोगती (आणि पर्यायाने देशाचीही) सोडली तर स्वातत्र्यपूर्व काळात आणि स्वातत्र्य प्राप्तीच्या प्रयत्नात कॉंग्रेसचा वाटा अमूल्य होता. त्या मानानं इतर विचारसरणी या पार्श्वभूमीवर फिक्या झाल्या-स्वातत्र्य संग्रामात जी अत्यत प्रभावी विचारसरणी 'राष्ट्रवाद' ती कॉंग्रेसनच दिली. अन् त्या दिशेनं प्रखर (आणि सुसघटित) प्रयत्नही केले आणि भारताच्या पूर्व वैभवाचो व परपरेची कमी अधिक जाणीव असणाऱ्या सर्व शिक्षित, अशिक्षित भारतीयाना हाच राष्ट्रवाद आपला वाटला त्यापुढ कम्युनिझम फिका पडला. तो काळच तसा होता.

१७-१०-७४ — **फणी पेंढारकर, पुणे**

मृदुलक्षणेची गोष्ट मोठीच विलक्षण आहे. तशी अगदी साधी; पण मोठे मानसशास्त्रीय सत्य सांगून जाणारी. हे सत्य वाल्मिकीने जाणले; पण मांडले नाही. रामाला सीता शुद्ध आहे याची खात्री एकदा नाही दोनदा करून घ्यावी लागली आणि अखेर या दिव्याने पतिपत्नींची कायमची ताटातूट झाली. ती ताटातूट सीतेला अभिप्रेत होती.

राम-सीतेचा जोडा मनाने अभंग राहिला का, असा प्रश्न आपण केव्हातरी स्वतःशी विचारतोच. उत्तर येत नाही. ते येण्यासारखे नसतेच. मग नवराबायकोची जोडी असावी तरी कशी ? तर मृदुलक्षणा राणी आणि तिचा राजा नवरा यांच्या सारखी. मी तर असे परस्परांवर इतका विश्वास असणारे आणि असा विश्वास आहे म्हणून मनुष्यमात्रांबद्दल प्रेमादर असणारे दुसरे जोडपे पाहिलेले नाही. व्यवहार आणि ध्येय इथे एकत्र झालेले आहे, तत्त्व आणि विनोद एकत्र आलेले आहेत. मोठी मजेदार पण माणसाला विचार करायला लावणारी ही कथा आहे.

**एक जातक कथा**

दुर्गा भागवत

**माणूस दिवाळी अंक**

# तराजूत न बसणारे कॉ. डांगे

नीलकंठ खाडिलकर, संपादक 'नवाकाळ'

दहा तारखेला गिरणी कामगाराचा पगार होतो. दहा ऑक्टोबरलाच शिवाजीपार्कवर कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार झाला. त्या दिवशी पगार घेताना गिरणीकामगारांना खचित वाटले असेल की, आपल्याला एवढा चांगला पगार मिळतो, बोनस मिळतो, ठराविक तासच काम करावे लागते. त्याचे श्रेय आज अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या कॉ. डांगे यांना आहे.

कामगारांना असे वाटले याची साक्ष शिवाजीपार्कवरील हजारोंच्या गर्दीने दिली. कॉ. डांगे यांच्या सत्कारात डावे कम्युनिस्ट, लालनिशाण, जनसंघ, स्वतंत्र अशा पक्षांचा स्वाभाविकपणेच सहभाग नव्हता. उजव्या कम्युनिस्टांतही कुरबूर होतीच. प्रभाकर कुंटे आदि काँग्रेसजन आले ते व्यासपीठावर बसण्यासाठीच येत होते आणि जणू काही त्यांच्याच सोयीसाठी आजवर कधीही नाही इतके भव्य व्यासपीठ शिवाजी पार्कवर उभारले होते. मग आले होते तरी कोण? हृदयापासून अभिष्टचिंतन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने कृतज्ञ कामगार आले होते!

सत्काराला उत्तर देताना कॉ. डांगे यांनी एक वाक्य असे उच्चारले की त्यात त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे बीजच सापडले. ते म्हणाले की, 'मी साम्यवादाची प्रेरणा लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'पासून घेतली– रशियन कम्युनिस्ट मला शिकवायला आले नव्हते!' कॉ. डांगे कम्युनिस्ट का झाले आणि कडव्या कम्युनिस्टांना ते कम्युनिस्ट का वाटत नाहीत त्याचे रहस्यच या वाक्याने उलगडते.

कम्युनिस्टांचा पोथ्यापुराणावर विश्वास नाही, पण कम्युनिस्टांची स्वतःची पोथ्यापुराणे आहेतच! त्यातील प्रत्येक शब्दाला वेदोक्ताचेच स्थान आहे. कम्युनिझम आंतरराष्ट्रीयच असतो आणि म्हणून त्यात राष्ट्रीयत्त्वाला स्थान नाही असे पोथीवद कम्युनिस्ट म्हणतात. पण कॉ. डांगे स्वतःला 'भारतीय कम्युनिस्ट' म्हणवितात! जिथे भारतीयत्त्वाला स्थान नाही तिथे संयुक्त महाराष्ट्रासारख्या भाषिक आंदोलनाला स्थान असणे कसे शक्य आहे? पण कम्युनिस्ट डांगे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे सर्वात प्रमुख नेते होते! कम्युनिस्ट राष्ट्र कधी आक्रमण करीत नाही आणि म्हणून चीनने आक्रमण केले नाही असे डाव्या कम्युनिस्टांचे कॉ. बी. टी रणदिवे सांगत राहिले. पण कॉ. डांगे यांनी चीनच्या धोरणावर प्रहार केले. माओंची यथेच्छ निर्भर्त्सना केली एकादशीच्या फराळात कांदा-लसूण तसे सांचेवद कम्युनिस्टांत कॉ. डांगे आहेत.

हे झाले धोरणातील फरक! पण कॉ. डांगे कम्युनिस्टांसारखे दिसत सुद्धा नाहीत. कम्युनिस्ट म्हटला की ठराविक चित्रच नजरेसमोर उभे रहाते. केस पिंजारलेले, डोळे विस्फारलेले, बोलणे म्हणजे बेंबीच्या देठापासून ओरडणे आणि हास्यविनोद म्हणजे भयंकर गुन्हा! याउलट कॉ. डांगे कमालीचे नीटनेटके. नुसते नीटनेटकेच नाहीत तर कलात्मक. पोशाख साधाच पण अत्यंत स्वच्छ नि रुबाबदार. डोळे टपोरे आणि अगदी बोलके– असे डोळे मी फक्त बालगंधर्वांचेच पाहिले! कॉ. डांगे यांनी फार पूर्वी 'सत्तेचे गुलाम' या नाटकात वैकुंठ रंगविला होता आणि त्यांची ही भूमिका बापूसाहेब पेंढारकरांच्या तोडीची झाली होती असे सांगतात ते नक्कीच खरे असणार. ते डोळ्यांनी बोलतात, चेहऱ्याने बोलतात आणि आपल्या मिस्कील हास्याने जे सुचवून जातात ते तर शब्दांनीही बोलता येणार नाही. कॉ. डांगे यांच्या आवाजात 'गोल्डन रिंग' आहे. वाक्यांची फेक रेशमी मुलायम असते आणि विषय रंगवीत खुलवीत टिपेला नेऊन मध्येच ते कम्युनिस्टांचा हातोडा विरोधकांच्या डोक्यावर हाणतात तेव्हा त्यांनी सारा श्रोतृवृंद जिंकलेला असतो. सभेला इतर कम्युनिस्ट वक्ते वेळेवर येतात. कॉ. डांगे कधीही वेळेवर येत नाहीत. सभा सुरू झाली, खूप गर्दी उडाली आणि एकाददुसरे भाषण संपले की डोक्यावर मस्त फरची टोपी घालून कामगारांच्या जयघोषात एखाद्या बादशहाच्या रुबाबात कॉ. डांगे व्यासपीठावर येतात व श्रोतृवर्गाकडे पहात मिस्किल हास्य करून सलामीलाच सभा काबूत घेतात त्यांचे भाषण म्हणजे मैफलच असते. हास्याची कारंजी उडवीत छोटी छोटी वाक्ये चमकतात आणि एखाद्या जादुगाराप्रमाणे या कारंजातूनच आगीचा होळ उत्पन्न करीत भडका उडवून देतात! लोकांना झटकन समजेल अशा कौशल्याने अवघड विषयही मांडला जातो. अन्य कम्युनिस्ट नेते गिरणीकामगारांना कम्युनिझम अशा रितीने सांगतात की, कम्युनिझम आपल्याला समजणारच नाही अशी त्यांची खात्री होते! एका सभेत राणा भीमदेवी कम्युनिस्ट नेत्याने असाच प्रयत्न करून गिरणीकामगारांना वैताग आणला. गिरणीकामगारांना झोप आली पण आरडाओरड्याने वक्ता झोपूही देत नव्हता! मग कॉ. डांगे उभे राहिले व बोलू लागले–

'तुमच्या गिरणीचा मालक कोण रे?'

'पुंजीपती धनराम...'

'म्हणजे गिरणी पुंजीपतीची! गिरणीत काय होते? कापसाचे सूत आणि सुताचे कापड– होय ना!

'होय! होय!'

'कापूस कोण पिकवतो?'

'शेतकरी!'

'सुताचे कापड यंत्रावर बनते! यंत्र कोण चालवतो?'

'आम्ही!'

'म्हणजे कामगार! शेतकरी कापूस पिकवतो. तुम्ही यंत्रावर कापड तयार करता! पुंजीपती कापूस पिकवीत नाही– कापड बनवीत नाही! तो गिरणीत आला नाही तर गिरण चालेल का?'

'चालणारच! मालक गिरणीत येतच नाही!'

'तुम्ही गिरणीत गेला नाही तर गिरणी चालेल का?'

'नाही– नाही– गिरणी बंद!'

'शाब्बास! मालक आला नाही तरी गिरणी चालू आणि कामगार आला नाही तर गिरणी बंद! मग गिरणी पुंजीपतीची कशी? गिरणी आहे तुझी! कामगाराची! बरोबर ना?'

'अगदी बरोबर!'

'समजले ना?'

'समजले तर!'

'म्हणजे तुम्हाला कम्युनिझमच समजला! गिरणीत काम करतो त्या कामगाराची गिरणी–हा कम्युनिझम! तुम्हीच मालक आहात असं मी सांगतो–हा कम्युनिझम!' कामगार विभागातच वावरणाऱ्या कॉ डांगेंना अनेक पांढरपेशांनी पाहिलेले नाही व ऐकलेले नाही. सात वर्षांपूर्वी 'नवाकाळ'च्या रोटरीचे उद्घाटन झाले तेव्हा ना. यशवंतराव चव्हाण, कॉ. डांगे, साथी एस. एम. जोशी ही त्रिमूर्ती आली होती. त्या सभेत कॉ. डांगे यांना प्रथमच पाहिलेल्या काही श्रोत्यांनी मला मुद्दाम सांगितले की, 'कम्युनिस्ट असा मिस्किल, विनोदी, मुलायम बोलणारा असतो यावर अजून विश्वासच बसत नाही. माझी कल्पना वेगळीच होती.' त्यांच्या कल्पनेपेक्षा कॉ. डांगे वेगळे आहेत याचे कारण कम्युनिस्ट तत्त्वज्ञान त्यांच्यावर स्वार झालेले नसून ते कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर स्वार झाले आहेत!

कॉ. डांडे यांचे जीवन इतके दगदगीचे, धावपळीचे आणि अनेकविध लढ्यांचे आहे की त्यांना व्यक्तीगत जीवनच राहिले नाही. रोझा ही त्यांची फार लाडकी मुलगी, पण तुरुंगाचे गज आडवे आले. ती तीन महिन्याची झाली तेव्हा कॉ डांगे यांनी तिला प्रथम पाहिले. नंतर एकदम सहा वर्षांची असताना बघितले! अठरा वर्षे तुरुंगात घालविली आणि अन्य वर्षे रणमैदानात गेली! रोझा आजारी झाली तरी लक्ष द्यायला फुरसत नव्हती आणि कान जाण्याची आपत्ती ओढवली ती सुदैवानेच टळली. पण कॉ. डांगेंना व्यक्तीगत नसले तरी स्वतःचे रसरशीत व्यक्तीमत्त्व आहे. त्यांची रहाणी चैनीची बिलकूल नाही–पण नजरेत भरावी किंवा खुपावी अशी कलात्मक आहे. आपण चहा पितो तो आपल्याला कसलाही चालतो. उकळून बासुंदी केलेला असो किंवा पावडरच्या दुधाचा असो पण कॉ. डांगे यांना छानदार किटलीतून चहाच्या पत्तीवर गरम पाणी ओतलेला चहाच पाहिजे. मग बोलता बोलता मधूनच ते झाकण उघडतात आणि हवा तेवढा लाल रंग चढलेला दिसला की चहा ओतून चवीने पितात. नाहीतर चहाच नको! बारीक सारीक बाबतीतही कॉ. डांगे यांचे वेगळेपण आहे ते असे.

कॉ. डांगे आपले व्यक्तिमत्त्व कधी लपवीतही नाहीत आणि त्यामुळे पक्षांतर्गत जो विरोध उसळतो त्याची पर्वाही करीत नाहीत. एका सभेतच त्यांनी जाहीर केले की, 'मी भारतीय आहे, कम्युनिस्ट आहे आणि डांगे आहे!' बंदुकीची गोळी नेमकी झाडावी तशी त्यांची छोटी छोटी वाक्ये असतात. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात एकदा निवडणूक तिकिटाचा कॉ. डांगे की आचार्य दोंदे असा वाद चालू होता. त्यांच्या या जागेवरील हक्काचा उलटसुलट पंचनामा बराच चालला. कॉ. डांगे यांची प्रतिक्रिया मिळावी म्हणून धडपड केली पण ते दौऱ्यावर होते. शेवटी एकदाचे फोनवर गाठले. कॉ. डांगे यांनी एकाच वाक्यात साऱ्या वादावर बोळा फिरविला. ते म्हणाले, मला एवढेच सांगायचे आहे की मी तराजूत बसणारा नव्हे!'

त्यांचे व्यक्तिमत्त्व अन्य कम्युनिस्टांप्रमाणे एकेरी नाही. ते चतुरस्त्र आहेत. सत्य साईबाबांच्या चमत्कारावर त्यांनीच प्रदीर्घ मुलाखत आणि नंतर इतरही साधुसंतांच्या मुलाखती मी घेतल्या होत्या. या मालिकेतील सर्वांत शेवटची मुलाखत कॉ. डांगे यांची होती हाही एक चमत्कार होता! चमत्कारावर कम्युनिस्ट बोलणार म्हणजे 'थोतांड' या शब्दापासूनच सुरुवात करणार! पण कॉ. डांगे यांनी 'चमत्कार खरे आहेत' असे ताडकन सांगून त्याची शास्त्रीय मीमांसा केली आज वाटणारे चमत्कार हे उद्याचे शास्त्रीय नियम असतात आणि म्हणून चमत्काराचे बुवाबाजीसाठी भांडवल न करता त्यांची शास्त्रीय उकल करावी असे मत त्यांनी मांडले. कॉ. डांगे यांची प्रकृती पूर्वी अत्यंत खालावली असता त्यांच्यावर कॉ. चितळे यांनी उपचार केले. कॉ. चितळे विक्षिप्त होते. हा कम्यूनिस्ट नेता मधूनच हिमालयात नाहीसा होई आणि तेथून 'चमत्कार' या सदरात मोडतील अशी विद्या घेऊन येई अशा कॉ. चितळेंनी यशस्वी उपचार केले–त्यांची डायरी श्री प. रा. इनामदार यांच्याकडे आहे–म्हणूनच कॉ. डांगे यांचा अमृतमहोत्सव साजरा होऊ शकला. कॉ. डांगे यांच्या पत्नी शनीमहात्म्ये वाचतात, पण त्याला विरोध न करता कॉ. डांगेंनी स्वतःच शनीमहात्म्ये वाचले आणि प्रतिकूल मत झाल्यावर वेळप्रसंगी अशा पारायणांची थट्टाही उडविली. मात्र प्रतिबंध केला नाहीच! भारतातील प्राचीन ज्ञान आणि विद्या यांचा शोध घेतात, मर्म पकडतात आणि चांगले ते उचलून टाकाऊ त्यावर साधार टीका करतात. कॉ. चितळे यांच्यामुळेच कॉ. डांगे आजारातून बरे झाले आणि रोजच्या प्राणायामामुळेच त्यांची तोळामासा प्रकृती ७५ व्या वर्षीही टिकून राहिली. प्राणायाम करतानाही ते प्राणायामाच्या परिणामांचा शोध घेतच असतात. वेदांपासून थेट आजच्या नवनाट्यापर्यंत ते वाचतात आणि जे वाचतात त्याचे निरूपणही करतात. मात्र त्यांचा चष्मा मार्क्सवादी आहे. शिवाजीराजाबद्दल बोलताना ते सांगतात की, शिवाजीराजांनी वतने नष्ट केली, सरंजामशाही मोडली. गरिबांना सहाय्य केले आणि म्हणूनच सारा मावळा एकवटला. मी कॉ. डांगे यांच्या अनेकमुलाखती घेतल्या. या मुलाखतींचा आशय मोठा नेत्रदीपक व अनपेक्षीत असे पण निष्कर्ष ठरलेला–'कम्युनिझम आला तरच ही परिस्थिती पालटेल!'

कॉ. डांगे आणि कॉ. रणदिवे हे दोघेही कॉलेज जीवनातील स्कॉलर. दोघांचेही सारे जीवन कम्युनिस्ट चळवळीला वाहिलेले. पण दोघांनी दोन टोकांना उभे राहून एकमेकांना पक्षांतर्गत विरोधच केला. याचे कारण दोघांची घडणच वेगळी झाली. कॉ. डांगे यांनी लोकमान्य टिळकांपासून स्फूर्ती घेतली, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या तेजाचे ते चहाते होते आणि मार्क्स-लेनिनकडून शास्त्रीय बैठक घेऊन

'भारतीय कम्युनिस्ट' या भूमिकेत ते वावरले. स्वातंत्र्यपूर्व काळातच त्यानी एका पत्रकाराच्या प्रश्नाला उत्तर देताना सागितले की, 'मी भारतीय कम्युनिस्ट आहे—बोल्शेव्हिक नव्हे! रशियन कम्युनिस्टांना बोल्शेव्हिक म्हणतात आणि रशियातून कुणीही मला शिकवायला आला नव्हता.' आज रशियाची भारताशी घनिष्ट मैत्री आहे त्याचे कॉ. डांगे हे पडद्यामागचे एक सूत्रधार आहेत. आजही ते रशियाकडून शिकत नाहीत—रशियनाना ते शिकवितात! याउलट कॉ. रणदिवे याची प्रेरणा शुद्ध मार्क्सची आहे. मार्क्स-लेनिनने जे लिहिले ते कॉ. रणदिवे यांना वेदोक्ताप्रमाणे प्रमाण आहे.

कॉ. रणदिवे याचा भर पक्षातर्गत सघटनेवर आणि वैचारिक कर्मठपणावर आहे. लहान पण कडवे गट वारवार अभ्यासवर्ग घेत ते निर्माण करतात असे कडवे गट एकवटून आदोलनासाठी उभे ठाकले की वैतागलेली जनता आपोआप त्यांच्यामागे उभी राहून क्राती होते अशी त्यांची भूमिका आहे. या कडव्या गटासाठी कॉ. रणदिवे प्राणही पणाला लावतात. त्याच्या अडीअडचणीची चौकशी करतात व धावून जातात. कॉ. डागे सहकाऱ्याची अशी विचारपूस कधी करीत नाहीत ते आपल्या डौलातच असतात. हा डौल कोणता? हा डौल असतो लोकप्रियतेचा आणि बुद्धिमत्तेचा! कॉ डागे कामगारात लोकप्रिय आहेत. ते निवडणुकीला उभे असतात तेव्हा इतराप्रमाणे घरोघर फिरत नाहीत पदयात्रा काढीत नाहीत. तरीही त्याना भरघोस मते पडतातच याचे कारण ते सतत कौशल्याने महत्त्वाच्या लढाया लढवीत असतात आणि आपल्या वक्तृत्वाने हजारो कामगारांच्या समुदायाला डुलवीत असतात काँग्रेसमध्ये सरदार पटेल सघटक आणि पडितजी म्हणजे लोकप्रियतेचा रेकॉर्डच होता! पक्षातर्गत पकड सरदार पटेलाची होती, पण लोकप्रिय पडित नेहरूना डावलणे अशक्य होते. कॉ डागे याची कम्युनिस्ट चळवळीत नेहरूसारखीच स्थिती राहिली. त्याना डावलता येत नव्हते आणि आवरताही येत नव्हते!

कॉ. रणदिवे हे 'सेल्स'वादी—पक्षातर्गत गटबाधणीवर भर देणारे आहेत. कॉ. डागे याचा भर 'मास मूव्हमेंट'वर आहे. कॉ. रणदिवे सहकाऱ्याच्या जिवाला जीव देणारे आहेत तर कॉ. डागे सयुक्त महाराष्ट्रासह सर्व जनआदोलनात हिरिरीने लढणारे आहेत. कॉ. डागे यानी आपली बुद्धिमत्ता कामगाराच्या मनाला भिडेल अशा वक्तृत्वासाठी आणि डावपेचासाठी वापरली. त्याचे बहुरगी बहारदार वक्तृत्व त्याच्या मूळ भूमिकेतूनच फुलले. त्यानी वक्तृत्वाने नेतृत्व आणि नेतृत्वाने वक्तृत्व केले. त्याना टाळ्या घ्याव्या लागत नाहीत. त्या दणाणून पडतात! हशासाठी त्याना विदूषकी करावी लागत नाही—सूचक खुबीदार वाक्यावर हास्यस्फोट होतो! ते भितीवर आदळणारी मुसडी मारीत नाहीत तर डावपेचानी लढत असतात. श्रीकृष्णाने एक काडी आडवी चिरून जरासधाच्या वधाची युक्ती सागितली आणि माडीवर थाप मारून दुर्योधनाच्या वधाचा मार्ग दाखविला. कॉ. डागे याची शैली अशाच प्रकारची आहे.

कामगारांना चिथावण्यासाठी ते घसा खरवडीत नाहीत. सहजी सांगतात—'आपल्याला शाततेने लढायचे आहे. गाधीसारखा आपला सत्याग्रह आहे पण सरकार जर शांततामय मोर्चावर लाठ्या चालवू लागले तर तुम्हाला माहीतच आहे की तुमच्या हाती झेडा आहे आणि झेड्याखाली दडा आहे!!' केरळमध्ये कम्युनिस्ट राजवट आली. त्यानतर काही महिन्यातच मोठ्या उत्साहाच्या वातावरणात मुबईत प्रचड सभा झाली. केरळात कम्युनिस्टावर हल्ले सुरू होते त्याचा उल्लेख करून कॉ. डागे म्हणाले—'आम्हाला कुणावरही हल्ले करायचे नाहीत. मात्र आमच्या कार्यकर्त्यांचा खून करणाऱ्याना आम्ही सागून ठेवतो. आमच्या पक्षाचे सभासद कमी केलेत तर तुमच्या पक्षाचा त्यापेक्षा एक अधिक सभासद कमी होईल! फक्त एकच! या त्याच्या वाक्यासरशी जो टाळ्याचा कडकडाट झाला आणि घोषणांचा गडगडाट झाला तो अजुनही कानात घुमतो.

इडोनेशियात कम्युनिस्ट पक्ष आत्यतिक प्रबळ होता पण त्याची कत्तल झाली. भारतात सशस्त्र क्रातीची तयारी नसता तसा प्रयत्न करणे म्हणजे कम्युनिस्ट चळवळीचे शिरकाणच होऊ देणे अशी त्याची भूमिका आहे. म्हणून काँग्रेसमध्येच पुरोगामी व प्रतिगामी असे भेद करून पुरोगाम्यावर जनआदोलनाचा दबाव आणीत समाजवादी वाटचाल साधणे हे कॉ डागे यांचे धोरण आहे. काँग्रेसनतर प्रतिगामी सत्तारूढ होणार असतील तर काँग्रेसची सत्ता त्यापेक्षा बरी असे ते सागतात. शिवाजीपार्कच्या सत्कार प्रसगी कुणाशीही समझोता करून इदिराजीचे सरकार पाडण्याच्या धोरणाला त्यानी अवघ्या एका वाक्यात उत्तर दिले की, व्यक्तिद्वेषाने राज्य बदलत नसते!

कृष्ण मेनन विरुद्ध आचार्य कृपलानी ही निवडणूक काही वर्षांपूर्वी अत्यत गाजली. सर्व थैलीशहाचा कृपलानीना प्रचड पाठिबा होता. पुजीपती गोएकाच्या सर्व वृत्तपत्रानी कृपलानीचा प्रचार रकानेच्या रकाने भरून चालविला होता. अशा वेळी कॉ. डागे यानी आपली भूमिका याच धोरणाने आणि त्याच खुबीदारपणे जाहीर केली. ते म्हणाले की, 'आपल्या पक्षाचा कुणीच उमेदवार उभा नाही. मग आपण काय करायचे? आपला उमेदवार नसला तरी थैलीशहाचा पाठिबा असलेले कृपलानी पडलेच पाहिजेत! तेव्हा मत असे द्या की कृपलानी पडलेच पाहिजेत! कृष्ण मेननना पाठिबा न देताच त्यांनी असा पाठिबा दिला!

एकदा बातचीत सुरू असता कॉ. डागे म्हणाले की, 'आमचा तो मित्र आमचे भले करणार नाहीच पण पूर्ण वाटोळे करणार!' यावर एकजण उद्गारला, 'डागेसाहेब, कुणीही माणूस तुमचे भले करील किंवा न करील, पण वाटोळे कधीच करू शकणार नाही! कॉ. डागे यानी या सूचकतेला मनसोक्त हसून दाद दिली.

कॉ. डागे यांचे वाटोळे कुणी करू शकला नाही आणि शकणार नाही! ते नेतृत्व करीत आहेत तोपर्यंत त्याच्या कम्युनिस्ट चळवळीचेही कुणी वाटोळे करू शकणार नाही! □

# अरब राष्ट्रे : एकीआड येणारे संघर्ष

वा. दा. रानडे

अरब राष्ट्रांची शिखर परिषद आज २६ ऑक्टोबरला राबात येथे सुरू होत आहे. अरब राष्ट्रांची एकजूट कशी टिकवायची हा परिषदेपुढे सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. गेल्या वर्षी इस्राइलशी युद्धात ही राष्ट्रे एकत्र आली पण अंतर्गत संघर्ष व मतभेद पुन्हा डोके वर काढू लागले. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डॉ. किसिंजर यांच्या मध्यस्थीने युद्धतहकुबी झाली. अरब इस्राइल संघर्ष शांततेने व व तडजोडीने मिटविण्यासाठी जिनिव्हा येथे शांतता परिषदेची प्राथमिक बैठक गेल्या डिसेंबरात झाली, पण त्यानंतर गेल्या दहा महिन्यात पुन्हा बैठक भरलेली नाही. अशी ही अनिश्चित, अस्थिर परिस्थिती किती काळ चालू ठेवायची ? युद्ध नाही आणि शांतताही नाही ही स्थिती असह्य झाल्यानेच अरबांनी गेल्या ऑक्टोबरात युद्ध पुकारले. आता पुन्हा तशीच परिस्थिती सहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे ही स्थिती फार काळ न रहाता पुन्हा युद्ध होईल असेही अंदाज केले जात आहेत पण तशी चिन्हे दिसल्यास अरबांचा प्रथम हल्ला होण्याची वाट इस्राइल यावेळी पहाणार नाही.

अरब लीग ही अरब राष्ट्रांची संघटना. या संघटनेत वीस राष्ट्रे आहेत. दहा मे १९४५ ला या संघटनेची स्थापना झाली. सुरुवातीला इजिप्त, इराक, जॉर्डन, लेबानन, सौदी अरेबिया, सीरिया आणि येमेन ही राष्ट्रे या लीगची सभासद होती. नंतर इतर अरब राष्ट्रेही या संघर्षात सामील झाली. ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र इस्राइलची स्थापना होऊ द्यावयाची नाही हे या लीगचे उद्दिष्ट होते पण त्यात तिला यश आले नाही. त्याचे महत्त्वाचे कारण अरबांमधील एकजुटीचा अभाव. इस्राइलच्या स्थापनेपासून चार वेळा युद्धाचे प्रसंग आले पण त्यात इस्राइल नष्ट तर झालेच नाही उलट प्रत्येक वेळी इस्राइलने अरबांचा प्रदेश जिंकून त्यांची मोठी हानी केली गेल्या वर्षीच्या युद्धातच अरबांनी इस्राइलला काहीसे बेसावध गाठले पण त्याचा फारसा फायदा ते करू शकले नाहीत.

इस्राइलशी संघर्षाच्या प्रश्नावर काय धोरण स्वीकारावयाचे याबाबत अरबराष्ट्रांचे मतभेद आहेत. इजिप्त व सीरिया यांचे धोरण साधारणपणे एक आहे. या दोन्ही राष्ट्रांनी फौजा अंशत: काढून घेण्याचे करार इस्राइलशी केले आहेत. या बाबतीत सौदी अरेबिया आणि अल्जिरियाने त्यांना पाठिंबा दिला आहे. पॅलेस्टिनी अरबांचे स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या प्रश्नावर अरब राष्ट्रांमध्ये मतभेद आहेत. वीस लाख निर्वासितांचा हा प्रश्न आहे. पॅलेस्टाइनच्या फाळणीनंतर ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र इस्राइल अस्तित्वात आले. आणि पॅलेस्टाइनचा अरब वस्तीचा भाग जॉर्डनने आपल्या राज्यास जोडून टाकला. पुढे १९६७ च्या युद्धात इस्राइलने हा प्रदेश जिंकून घेतला व तो त्यांच्याच ताब्यात आहे. इस्राइल नष्ट करण्याचे उद्दिष्ट बहुतेक अरब राष्ट्रांनी आता सोडून दिले असून त्यांचे अस्तित्व मान्य करण्याची त्यांची तयारी आहे. फक्त इस्राइलने जिंकलेला आमचा प्रदेश आम्हाला परत मिळाला पाहिजे एवढीच त्यांची मागणी आहे. आम्हाला आमच्या सीमांच्या सुरक्षिततेची हमी मिळत नाही तो पर्यंत जिंकलेला प्रदेश आम्ही सोडणार नाही अशी इस्राइलची भूमिका आहे. केवळ अरब राष्ट्रांनी अशी हमी दिली तर त्यावर इस्राइलचा विश्वास नाही. अमेरिका व रशिया या बड्या राष्ट्रांकडून त्यांना या बाबतीत हमी हवी आहे.

इस्राइलने जिंकलेला प्रदेश सोडला तरी तेवढ्याने तडजोड होत नाही पॅलेस्टिनी अरब निर्वासितांना स्वतंत्र राज्य मिळाले पाहिजे. जॉर्डनने आपल्या प्रदेशास जोडून घेतलेल्या पण सध्या इस्राइलच्या ताब्यात असलेल्या जॉर्डन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरी भागातच हे राज्य झाले पाहिजे अशी पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेची मागणी आहे. पॅलेस्टिनी अरबांची प्रातिनिधिक संघटना म्हणून पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेस गेल्या नोव्हेंबरमध्ये भरलेल्या अरब शिखर परिषदेत मान्यता देण्यात आली. जॉर्डनचे राजे हुसेन यांचा त्यास विरोध असला तरी अशा राज्याची स्थापना जॉर्डन रोखू शकेल असे वाटत नाही पॅलेस्टिन अरबांची प्रातिनिधिक संघटना म्हणून पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेस युनोनेही आता मान्यता दिली असून पॅलेस्टाइन प्रश्नावर पुढच्या महिन्यात होणाऱ्या चर्चेचे वेळी आपली बाजू मांडण्यासाठी या संघटनेच्या प्रतिनिधींना बोलावले आहे. पॅलेस्टिनी अरबांचे हंगामी सरकार आपण लौकरच स्थापन करू असे या संघटनेचे अध्यक्ष आराफत यांनी नुकतेच सांगितले या घडामोडी लक्षात घेता पॅलेस्टिनी अरबांच्या स्वतंत्र राज्याची स्थापना जॉर्डन रोखू शकेल असे वाटत नाही.

असे असले तरी या राज्याच्या स्थापनेत दुसरी एक अडचण निर्माण झाली आहे ती म्हणजे पॅलेस्टिनी अरबांमध्ये पडलेली फूट. हबाश यांच्या नेतृत्वाखालील पीपल्स फ्रंट फॉर दी लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन ही गनिमी संघटना पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेतून फुटून निघाली आहे. या संघटनेवर कम्युनिस्टांचा प्रभाव आहे. आराफत यांच्या सौम्य धोरणास त्यांचा विरोध आहे. इस्राइलचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्याची त्यांची तयारी नाही त्यांना इस्राइलच्या जागी स्वतंत्र धर्मनिरपेक्ष पॅलेस्टाइन राज्य स्थापन करावयाचे आहे. या राज्यात ज्यू, अरब व ख्रिस्ती एकत्र रहातील. पण पॅलेस्टिनी अरबांवर ह्या संघटनेचा कितपत प्रभाव आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इस्राइल नष्ट करावे असे अरबांना कितीही वाटत असले तरी ते शक्य नाही हे चार युद्धांवरून स्पष्ट झाले आहे तेव्हा इस्राइलचे अस्तित्व मान्य करून पॅलेस्टिनी अरबांचे स्वतंत्र राज्य जॉर्डन नदीच्या पश्चिम तीरावरील प्रदेशात स्थापावे हीच वास्तव भूमिका आहे. बहुसंख्य अरब राष्ट्रांना ती मान्य झालेली असून बहुसंख्य पॅलेस्टिनी निर्वासितांचाही याच भूमिकेस पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे तेव्हा पॉप्युलर फ्रंटने आपला विरोध चालू ठेवला तरी त्याला फारसा प्रतिसाद मिळण्याचा संभव नाही. काही काळ त्यांचे गनिमी हल्ले चालू रहातील पण त्या पलीकडे ते विशेष काही करू शकतील असे वाटत नाही.

तेल हे अरबांच्या हातचे एक प्रभावी शस्त्र आहे. तेलाच्या किंमती भरमसाट वाढवून आणि उत्पादन कमी करून जगात त्यांनी इंधन पेच प्रसंग निर्माण केला आणि आपल्या विरुद्ध असलेल्या काही राष्ट्रांचे धोरण आपल्याला अनुकूल करून घेतले.

इस्राइलशी युद्ध झाले तर अरब राष्ट्रे पुन्हा एकत्र येतील. पण युद्ध नसेल तेव्हा त्यांच्यातील मतभेद व संघर्ष डोके वर काढतात. तेलावर मिळविलेल्या अमाप संपत्तीमुळे सौदी अरेबियाने एक वजनदार राष्ट्र म्हणून जगात स्थान मिळविले आहे. राजे हुसेन विरुद्ध पॅलेस्टिनी अरब या सारख्या स्थानिक संघर्षात तो देश दुय्यम भूमिका पत्करणार नाही. अरब जगातील दुसरा एक विरोध म्हणजे इस्राइलशी लढायला आघाडीवर असलेली राष्ट्रे राजकीय दृष्ट्या अधिक पुरोगामी पण त्यांना आर्थिक मदतीसाठी अवलंबून रहावे रहावे लागते सौदी अरेबियासारख्या प्रतिगामी राजवटीच्या आर्थिक मदतीवर. या निरनिराळ्या कारणांमुळे अरब राष्ट्रांची संघटित प्रभावी आघाडी उभी राहू शकत नाही.

# सोलकढी

## □ आणखी एक दलित जमात

प्राध्यापक या जमातीचे मला फार्फार भय वाटते : त्यांचे ते अविरत चिंतन करणे, त्यांचे ते न थांबता फाडफाडफाड बोलणे, त्यांचे ते राष्ट्राचे आधारस्तंभ होऊन राहणे, त्यांचे ते आदर्श नागरिक घडवणे, त्यांचे ते शैक्षणिक वातावरण निर्दूषित ठेवण्यासाठी जीवापाड झटणे, त्यांचे ते समाजाची आणि संस्कृतीची सेवा करत चंदनासारखे झिजणे, त्यांचे ते तुमच्यामाझ्यासारख्या जनसामान्यामध्ये असामान्य होऊन ठुमकणे, त्यांचे ते त्यांचे असणे, या साऱ्यामुळे मला त्यांचे आदरयुक्त भय वाटते किंवा त्यांच्याबद्दल भययुक्त आदर वाटतो. (आदरयुक्त भय आणि भययुक्त आदर या गोष्टी तुम्हाआम्हाला सारख्याच वाटल्या तरी त्यांच्यात किती मोठा फरक आहे याचे विस्तृत ऊहापोहात्मक विश्लेषण किंवा विश्लेषणात्मक ऊहापोह कोणताही जमातीवंत प्राध्यापक सहज करू शकेल.) अशा बत्तीसगुणी आणि छत्तीसलक्षणी नरनारींची भलीभर्भराट व्हावी असे मी आपला मनातल्या मनात व जनातल्या जनात सारखे म्हणत असतो.



पण आपला सारा समाज माझ्याएवढा कृतज्ञ थोडाच आहे. प्राध्यापक जमातीची थोर्थोरवी त्याला उमजतच नाही. त्यामुळे ही आणखी एक दलित जमात आपण पैदा केली आहे. प्राध्यापकांना आठवड्यातून तब्बल पंधरा ते सतरा व्याख्याने द्यावी लागतात; उर्वरित सारा वेळ या व्याख्यानांच्या तयारीसाठी द्यावा लागतो. त्यामुळे पैसे मिळवून देणारी इतर कामे हाती घेता येत नाहीत; मिळणारा मासिक पगार आणि वार्षिक परिक्षकगिरीचे पैसे यात संसार चालवताना तोंडाला फेस येतो. (तोंडाला फेस आला की व्याख्याने फेसाळ होतात.) ही परिस्थिती खरे म्हणजे आपल्या समाजाला लांछनास्पद आहे. पण तो कोडगा समाज प्राध्यापक जमातीबद्दल कोरडी सहानुभूतीसुद्धा दाखवत नाही; मग तिच्यासाठी अलोटओले प्रयत्न करायची बातच सोडा.

अखेर स्वतःच्या उद्धारासाठी प्राध्यापकांनाच आपल्या पायावर उभे राहायची पाळी आली. नाईलाजच झाला. राहिले ते उभे. साऱ्या देशभर उभे राहिले. मुंबईतले त्यांचे ते उभे राहाणे मी पाहिले आणि आदरातिशयाने माझे मस्तक इतके झुकले की ते आता पुन्हा पूर्वी होते तसे होईल की नाही याची मला शंका वाटते.

कारण असे की केवळ पगारवाढ, नोकरीची शाश्वती, संतोषकारी सेवानियम अशा स्वार्थी ध्येयासाठी ही बुद्धीवंत माणसे उभी राहिली नाहीत. त्यांना देशात नवे शिक्षणयुग निर्माण करायचे आहे. रिकाम्यापोटी नवे शिक्षणयुग निर्माण होऊ शकणार नाही एवढ्यासाठीच पोटभरीची मागणी त्यांनी केली आहे. भरल्यापोटी कसे वाटते ते या बुद्धिविचाऱ्या जमातीला ठाऊकच नाही. तसे ते या गरीब देशातल्या अनेक जमातींना ठाऊक नाही म्हणा. पण त्यांचे पोट वेगळे, आणि प्राध्यापकांचे वेगळे. शिवाय प्राध्यापकांना खायचे आणि दाखवायचे अशी दोन पोटे असतात, असे मला हिरव्या झाडावरच्या हिरव्या पोपटाने हिरव्या चोचीने सांगितले आहे. □

## □ माझा आणि पंतप्रधानांचा होरा

रोजची वर्तमानपत्रे मी मोठ्या असोशीने आणि कसोशीने वाचतो. त्यात जे सुरस व चमत्कारिक असते तसे काहीही मला इतरत्र आढळत नाही. गेल्या काही दिवसातली वर्तमानपत्रे वाचल्यावर जी एक गोष्ट माझ्या अगदी पक्की लक्षात आली होती ती ही की आपल्या या प्रिय भारताचे काही खरे नाही. देशातली एकूण परिस्थिती नको तेवढी बिकटगंभीर झाली आहे. देशासाठी काहीतरी तडकाफडकी केले पाहिजे असे मला वाटून राहिले. तसे व्यक्तिशः माझे काही फार वाईट चालले नव्हते; बरेच चालले होते. मी दोन वेळा झोपत होतो; क्वचित मोरपिशी स्वप्ने पाहात होतो; चार वेळा खातजेवतगिळत होतो; चित्रपट-नाटके पाहात होतो; वाचनालयातून आणून पुस्तके वाचत होतो; मुमताझचे लग्न, अजित


वाडेकरची निवृत्ती, जयप्रकाशांची चळवळ, मराठीतली श्लील नाटके, ढाले आणि ढसाळ यांच्यातला बेबनाव, मुंबई विद्यापीठाचे चेकुट्रगुट्रम इत्यादी विषयांवर चर्चा-चऱ्हाट वळत होतो. तसे माझे खरोखरच बरे चालले होते. पण देशातली एकूण परिस्थिती नको तेवढी बिकटगंभीर झाली आहे, असे सर्व-साक्षी वर्तमानपत्रे सांगत होती. तेव्हा ती परिस्थिती कशी बदलता येईल याचा मी विचार करू लागलो. माझे मी एक पाहून ठेवले आहे : विचार करायला लागल्यावर मला नेहमी काहीतरी सुचतेच. या वेळीसुद्धा सुचले. वाटले की इंदिराबाईंनी मंत्र्यांची खाती बदलली की सारे ठाकठीक होऊन जाईल. मला काहीतरी अद्‌भुत सुचले होते. माझी कल्पना मी त्वरेने मोहन धारियांना कळवली; त्यांनी ती आपली म्हणून इंदिरा गांधींना सांगितली; आणि इंदिरा गांधींनी ती आपली म्हणून चक्क अंमलात आणली.

मंत्रिमंडळात खातेपालट होणार अशा वार्ता वर्तमानपत्रात येऊ लागल्या. कोणाकडे कोणते खाते जाणार याविषयीचे भाकड अंदाज वर्तवले जाऊ लागले. इंदिरा गांधी पंतप्रधानकीचे खाते सोडणार, असेही कित्ये-कांच्या टवकारलेल्या कानांवर आले. तसे मात्र झाले नाही. पण इतर बरेच खातेपालट खरोखरच झाले. माझी कल्पना, मोहन धारिया मार्गाने, पंतप्रधान इंदिरा गांधींपर्यंत पोचली. तिच्यात तथ्य दिसताच इंदिरा-बाईंनी ती अंमलात आणली. भारतीय लोक-शाही चिरायु होवो.

नव्या खातेपालटावर वर्तमानपत्रांनी नेहमीप्रमाणे टीकाटिप्पणी केली. आमच्या यशवंतराव चव्हाणांना, नेहमीप्रमाणे, अपमान गिळूनच, खातेपालट पत्करावा लागला. या माणसाचा काय भोग आहे पाहा : हिमा-लयाच्या साहाय्यासाठी गेलेल्या या सह्या-द्रीची (आणि साहाय्याद्रीचीसुद्धा) गेल्या बारा वर्षांत पार पर्वतीची टेकडी होऊन राहिली आहे. त्यांना गृहमंत्रिपद मिळाले तेव्हा आम्ही म्हटले : कुठे गृह आणि कुठे संरक्षण ? गृहमंत्रिपद जाऊन यशवंतराव अर्थमंत्री झाले तेव्हा आम्ही म्हटले : वाघोबाचा पाहा कसा बोकोबा केला. आता तर अर्थमंत्रि पदही गेले आणि फालतुफंटु परराष्ट्रमंत्रिपद झोळीत पडले. इतर देशात परराष्ट्रमंत्रिपद पंतप्रधानपदाच्या खालोखाल मानतात. हे मानणे, आता यशवंतराव परराष्ट्रमंत्री झाल्यावर आपण विसरावे हे बरे. कारण यशवंतरावांना कुठलेही पद मानाने कसे मिळू शकेल ? उद्या यशवंतराव पंतप्रधान होतील तेव्हा पंतप्रधानाला गुळाच्या गण-पतीचा डौल प्राप्त झालेला असेल, असा माझा अंदाज आहे. असो.

कपडे बदलल्यावर माणसाचा स्वभाव-सुद्धा जसा बदलतो किंवा अंगण सरळ केल्यावर नाचणे जसे सुधारते तसा केंद्रीय मंत्रिमंडळात खातेपालट झाल्यावर देशाचा रागरंग पालटून जाईल, असा माझा आणि पंतप्रधानांचा होरा आहे.

—अनंतराव



मुक्काम मुंबई । भारतकुमार राऊत

# एक होता वाडेकर

पी. टी. आय्. न मध्येच फ्लॅश दिला. 'वाडेकर रिटायर्ड !' आणि क्रिकेटमधल एक पर्व समाप्त झाल. पी. टी. आय्. च्या अशा फ्लॅशेस्‌मुळ आतापर्यंत असे कित्येक लोक इतिहासाच्या यादीत टाकले आहेत त्यापैकीच आता वाडेकर एक.

तर काय, वाडेकर प्रथमश्रेणीच्या क्रिकेटमधून निवृत्त झाला. म्हणजे अस की, शिवाजी पार्क, जिमखान्याच्या आणि स्टेट बँकेच्या मॅचेस् सोडून वाडेकर आता पुन्हा मैदानावर त्याचे आवडते स्क्वेअर कटस् आणि हूक टोलवताना दिसणार नाही 'अॅन्ड नाऊ वाडेकर इज कमिंग ऑन द फिल्ड,' अस वाक्य कॉमेंट्रिटरच्या तोंडून रेडिओवर ऐकू येणार नाही. कारण वाडेकर रिटायर्ड झालाय.

तर या वाडेकरला दहा-बारा वर्षांपूर्वीपासून आम्ही पाहून राहिलोयत. ज्या काळात वाडेकर रणजी क्रिकेटमध्ये नुकताच प्रवेश करीत होता, त्या काळात त्याच्या डावऱ्या फलदाजीला आम्ही टाळया मारल्यात. एकूण वाडेकरला आम्ही फार पूर्वीपासून ओळखतोय.

तर त्यानतर, एक-दोन दिवसानतर घडलेली गोष्ट. स्टेट बँकेतल वाडेकरच ऑफिस. पॉश. आसपासच्या सर्व खुर्च्या भरलेल्या. आम्ही गर्दीत उभे मग आम्हालाही खुर्ची मिळते. समोर अजित लक्ष्मण वाडेकर. पट्टयापट्टयाच्या डिझाईनचा फुलशर्ट. प्रसन्न व्यक्तिमत्व झकास गप्पा चाललेल्या. मोनॅको बिस्किट आणखीच चवदार लागत असतात. 'मी योग्य वेळी बाजूला होतोय. जेव्हा लोक मला का निवृत्त होतोस अस विचारीत आहेत तेव्हाच.' वाडेकर म्हणतो,

इग्लडमध्ये दणकट मार खाल्ल्यानतर आपल्या उत्साही क्रिकेट शौकिनानी 'वाडेकर हटाव'ची घोषणा केली. पण वाडेकर ती इतकी मनावर घेईल, अस वाटल नव्हत. किंबहुना अस वाटत होत की, येत्या वेस्ट इंडिजबरोबरच्या मालिकेत पुन्हा विजय मिळवून वाडेकर नाव कमावील. सरकार त्याला पद्मभूषण वगैरे देईल. पण तस झालच नाही. इग्लडमधल्या पराभवामुळे वाडेकर खचला का? पण या दारूण अपयशानतर त्यान इग्लडमध्येच जाहीर केल होत की, फीट असेपर्यंत मी खेळत रहाणार. मग वाडेकर आता अनफीट झाला का? किमान मानसीकदृष्टया तरी. जगज्जेतेपदाची आशा करणाऱ्या सघाचा ४२ धावात फज्जा उडावा ही गोष्ट त्यासघाच्या कर्णधारास नामुष्कीची खरीच. पण त्यामुळ त्यान तात्काळ राजिनाम्याची हाराकिरी करायलाच हव अस काही नाही. एकेकाळी जगातल्या सर्व देशाना पाणी पाजणाऱ्या वेस्ट इडिजचा न्यूझिलडने पराभवा केला तेव्हा सोबर्सन राजिनामा दिला नाही.

हसण खिदळण मजेत चालल होत. प्रेसकॉन्फरन्स रगात येत होती. आपल्या क्रिकेट जीवनातल्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी वाडेकर फॉर्मात येऊन सागत होता. तसा वाडेकर मुळात अबोल. थोडासा गर्विष्ठ. कामापेक्षा जास्त न बोलणारा. त्याला इतक दिलखुलास बोलताना पहाण्याचा हा दुर्मिळ योग. 'या क्रिकेटनं मला अपार आनंद दिला. गेली अनेक वर्षं क्रिकेट हे माझ्या जीवनाचं अत्यत महत्त्वाच अग बनून राहिल. लोक मला क्रिकेटमुळं ओळखायला लागले. कधी कधी याचा मला भयकर राग यायचा. पण त्याची सवय झाली. वाडेकर सागत होता, 'माझ्या जीवनातला अत्युच्च आनदाचा क्षण आम्ही ओव्हलवर जिंकलो तेव्हाचा.'

१९७२ च्या ऑगस्ट, सप्टेंबरचा सुमार. सकाळपासूनच सांताक्रूझ विमानतळावर गर्दीला सुरुवात झाली. साडेनऊ वाजेपर्यंत सारा विमानतळ नुसता फुलून गेला. इग्लडवर विजय मिळवून येणाऱ्या भारतीय क्रिकेट सघाचे अभूतपूर्व स्वागत करण्यात आल. सांताक्रूझ विमानतळापासून ते सी. सी. आय. पर्यंत या क्रिकेटवीराची उघडया मोटारीतून मिरवणूक काढण्यात आली. नाक्यानाक्यावर त्याच्या स्वागतासाठी कमानी उभारण्यात आल्या होत्या. साऱ्या मुबईत उत्साह नुसता ओसडत होता. सगळयात कौतुकाचा धनी होता अजित वाडेकर. अजित कर्णधार. लाखो लोक त्याला आशीर्वाद देत होते. दृष्ट काढीत होते.

पण दृष्ट लागलीच.

'तुझ्यानतर कॅप्टन कोण? या प्रश्नावर वाडेकरन आपल्या नेहमीच्या स्टायलीत खादे उडवले. पहिल्यांदा तो कुणाचंच नाव घ्यायला तयार नव्हता. 'फक्त गोलदाजी करणाऱ्याला कर्णधारपद देऊ नये', अस तो म्हणाला. मग म्हणाला की, 'ज्याच सघातलं स्थान आढळ आहे अशाला म्हणजे गावस्कर किंवा विश्वनाथला कर्णधारपद द्याव.' 'माझ्या निवडीच्या वेळीसुद्धा वादग माजले होते. पतौडीसारख्या मुरलेल्या कर्णधाराला बाजूस सारून मला कर्णधारपद देणं हा जरा धोकादायक निर्णय होता याची मला जाणीव आहे.'

वाडेकरची कर्णधार म्हणून निवड झाली तेव्हाची गोष्ट. रात्री आठचा सुमार होता. पी. टी. आय. न असाच फ्लॅश दिला होता. 'वाडेकर वुईल बी द नेक्स्ट कॅप्टन.' त्यानंतर पाच-दहा मिनिटातच आम्ही चार-पाच पत्रकार मडळी वाडेकरच्या घरी पोहोचलो. तो, बायकोबरोबर मार्केटिंगला गेला होता. त्याच्या आईवडिलाच्या चेहऱ्यावर ओसडणारा आनद अजून आठवतोय. त्यानी अगत्याने चहा-चिवडा दिला. मग वाडेकर आला. आपण कर्णधार होणार याची त्याला बातमी होतीच. पण ती नक्की झाल्याच समजताच तोही खूश झाला. मग पुन्हा गप्पा रात्रीचा दीड कधी वाजून गेला समजलसुद्धा नाही.

'यापुढे मी बँकेच्या जबाबदाऱ्या आणि कुटुब यामध्ये अधिक लक्ष घालणार आहे' वाडेकरन सागितल. प्रेस कॉन्फरन्स सपली. हळूहळू टक्कल पडू लागलेला वाडेकर खुर्चीत उठून उभा राहिला. डोक्यावरून हात फिरवीत. टोनी लुईसबरोबर टॉस उडवताना वाडेकर असाच उभा असायचा. बेदीची आणि चंद्राची गोलदाजी टोनी ग्रेग आणि कीथ फ्लेचर फोडून काढीत असताना त्याच्या तोडावर असच आगाऊ स्मित असायच.

तर असा वाडेकर. शिवाजी पार्क-जिमखान्यात कागा लीग खेळणारा. मुबई सघाच रणजीत नेतृत्त्व करणारा. भारतीय सघाचा अध्वर्यू बनलेला. अखेर त्याचीही क्रिकेटिंग इयर्स सपली. वाडेकर तसा उशीराच क्रिकेटमध्ये आला आणि लवकरच गेला. अवघ्या सहा-सात वर्षाचा काळ. या काळात फक्त एक शतक लावणाऱ्या वाडेकरनं कोणतेही उपक्रम केले नाहीत. फक्त तो आधार बनून राहिला. काही वर्षांनी सगळे त्याला विसरतील. आमच्यासारखे काही त्याचे शौकिन, पुढल्या पिढीला सांगत असतील 'एक होता वाडेकर!' □

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा : क्रमांक चार

# धैर्यमेरू चिंतापुडी रामरेड्डी

अशोक परळीकर, परभणी

रेणुकुटा ! हैदराबाद राज्याच्या नळगोडा जिल्ह्यातील दोनशे चाळीस उबऱ्याच एक चिमुकल गाव. आडवळणावरचे गाव. अर्थातच मागासलेले. गावाची रोजची दिनचर्या ठरलेली. पण आज गावाला जाग आली ती नव्या जाणिवेची. गावातील लहानथोर सर्वांच्याच चेहऱ्यावर अतीव उत्साह आणि अमाप आनद दिसत होता. घराघरात उजळलेले दिवे पारतत्र्याचा अधार नाहीसा झाल्याची ग्वाही देत होते. मुले आणि नागरिक भल्या पहाटेच स्नानादी विधी आटोपून एका मोकळया पटागणात गोळा झाले होते. आजचा उगवता सूर्य आगळा होता, आजचा प्रकाश वेगळा होता. या उगवत्या सूर्याने नवी आशा, नवा विश्वास, नवी जबाबदारी, नवी प्रेरणा नवा इतिहास दाखविला होता. पारतत्र्याचा तो काळाकुट्ट अध कार आता कायमचा लयाला गेला होता आणि ही भारतभूमी स्वातत्र्यसूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाली होती १५ ऑगस्ट १९४७ चा महन्मगल दिवस होता तो. पटागणात जागा सारवून ध्वजस्तभ उभारला होता. उपस्थिताच्या 'महात्मा गाधीकी जय', 'भारत माता की जय', 'वदे मातरम्' या निनादात राष्ट्रध्वज आकाशात मुक्त विहार करू लागला होता. उपस्थितांनी त्या डौलाने फडकणाऱ्या मानबिंदूकडे डोळे भरून पाहिले. अनेकाचे डोळे स्वातत्र्यलढयात सर्वस्वाचे दान देणाऱ्या सुपुत्राच्या स्मृतीने पाणावले होते. नतर मिरवणूक काढण्यात आली. 'भारतमाता की जय', 'वदे मातरम्' या घोषणानी आकाश निनादले. लोकाच्या आनदाला, उत्साहाला सीमा नव्हती. इकडे असा अपूर्व सोहाळा चालला होता. आणि दुसरीकडे या 'घटने'बद्दल हिंदूना कठोर शासन करण्याचे घाटत होते. तरुण रक्ताचे, नव्या उमेदीचे मुस्लीम त्या हरामखोर हिंदूना कठस्नान घालण्याची भाषा बोलत होते आणि अनुभवी, तसेच वयोवृद्ध मुस्लीम नेते त्याना सबूरीचा, शातीचा सल्ला देत होते एरवी दुसरे एखादे गाव असते तर सर्वांनीच शिक्षा करण्याचे मनावर घेतले असते. इथे त्याना धाडस करवले नाही. त्याचे एक-एकमात्र कारण म्हणजे त्या कार्यक्रमाचा सूत्रधार होता चिंतापुडी रामरेड्डी.

रामरेड्डी हा अत्यत धाडसी आणि दिलेर म्हणून त्या भागात प्रसिद्ध होता. मागेल त्याला यथाशक्ती तो मदत करायचा. एकदा रेणुकुटाजवळील बेगमपेठ गावी, मुस्लीम मक्तेदार कुटुबप्रमुखाचे निधन झाल्यावर वाटणीबद्दल बखेडा उत्पन्न झाला. बहिणीला काहीही द्यावयाचे नाही असा भावाचा – दिवगत मक्तेदार पुत्राचा – डाव होता बहीण बिचारी असहाय्य होती. शेवटी कोणा एकाने रामरेड्डीने लक्ष घातल्यास तुला न्याय मिळेल म्हणून तिला सागितले. तिने रामरेड्डीला हैदराबादला बोलावून घेतले. आणि सर्व परिस्थिती कथन करून मदतीची याचना केली. रामरेड्डीने तिला आश्वासन दिले आणि त्याप्रमाणे तो प्रयत्नासही लागला आपल्या साथीदाराच्या सहाय्याने त्याने सबधित जमीनीचा ताबा मिळविला आणि पेरणीची व्यवस्थाही केली. या अघटित घटनेने मक्तेदार पुत्रास तीव्र सताप आला. त्याने रामरेड्डीचा बदोबस्त करण्यासाठी हैदराबादहून अरबाची टोळी आणली त्या काळात अरबाचे फार प्रस्थ होते. त्याच्या विरुद्ध बोलले गेले की हत्यारालाच हात घालीत. पोलीसखातेही त्याच्या वाटेला जात नसे त्याना सर्वजण भिऊन असत. अरबाशी सघर्ष बडे-बडेही टाळीत आणि म्हणूनच आज रामरेड्डीची परीक्षा होती. त्याच्यासमोर केवळ दोनच पर्याय होते. एक मक्तेदार कन्येचा पक्ष सोडणे अथवा अरबाशी लढा देणे रामरेड्डी बहाद्दूर होता. त्याने अरबाचे आव्हान स्वीकारले आपल्या साथीदारासह तो जेव्हा अरबाचे समोर आला तेव्हा उन्मत्त आणि सतापलेल्या अरबानी त्यांच्यावर प्रखर हल्ला केला परतु घडले ते निराळेच. रामरेड्डी आणि त्याच्या साथीदारानी त्या अरबाना पाणीच पाजले. रामरेड्डीने अरबाच्या नायकावर झडप घातली आणि अति चपलतेने त्याचे नाक, कान कापून त्याला विद्रूप केले. आजवरच्या अरबाच्या अब्रूलाच विद्रूप केले म्हणाना. मग काय ? ते बहाद्दर (!) अरब चौफेर उधळले मक्तेदार कन्येला तिचा वाटा मिळाला. आणि पचक्रोशीत रामरेड्डीचा धाक बसला. अरब आणि मुसलमानानी त्याचा धसका घेतला. रामरेड्डीची प्रतिष्ठा वाढली.

दुसरा प्रसगही असाच. मुटकोडूर गावी जायदादीवरून एक झगडा उपस्थित झाला. एका पक्षाकडून चिंतापुडी रामरेड्डीही होता. एकदा विरुद्ध पक्षाच्या लोकांनी हातघाईच्या प्रसगी पोलिसाना हस्तक्षेप करावयास सागितले. पोलिसाना अशी सधी हवीच होती. त्याना रामरेड्डीवर 'रुबाब करावयाचा' होता. ते घटनास्थळी पोहोचले. आणि थोड्याच वेळात रामरेड्डीही आला. शब्दाने शब्द वाढला आणि चिडून जाऊन एका कॉन्स्टेबलने रामरेड्डीवर गोळी झाडली. पण आयुष्याची दोरी बळकट असल्यामुळे तो वाचला. प्रत्युत्तरात केलेल्या गोळीबाराला अमीन–इन्स्पेक्टर बळी पडला. पोलीस अधिकाऱ्याच्या हत्येचा आरोप रामरेड्डीवर लादून त्याला न्यायालयात उभे करण्यात आले. गुन्हा भयकर होता. रामरेड्डीला कठोर शिक्षा मिळणार याबद्दल कोणालाही सदेह नव्हता सुनावणीच्या दरम्यान पोस्टमार्टेम रिपोर्टवर चर्चा झाली., इन्स्पेक्टरच्या

शरीरातून रायफलची गोळी काढण्यात आल्याचा उल्लेख रिपोर्टात होता. आणि रायफलचा उपयोग केवळ कॉन्स्टेबलने केलेला होता. असा युक्तिवाद करण्यात आला. न्यायाधिशानी उपस्थित झालेला मुद्दा ग्राह्य धरला आणि रामरेड्डीची निर्दोष सुटका केली. रामरेड्डी-जवळ त्यावेळी भरमार बदूक होती हे नोंदलेले होते. शत्रूपक्षाचे थोबाड 'आबट' झाले. रामरेड्डीच्या या यशाने त्याच्या कीर्तीत भर पडली तसेच शत्रूपक्षाला असलेल्या धाकातही.

–आणि केवळ रामरेड्डीशी समर प्रसग आहे म्हणूनच अनुभवी (!) मुसलमानांनी नव्या रक्ताच्या तरुण मुसलमानाना हा असा सबुरीचा सल्ला दिला. नळगोडा जिल्ह्यांतील त्या परिसरात रेणुकुटा हे एकच गाव असे होते की जिथे तिरगाध्वज त्या दिवशी डौलाने फडकत होता– रामरेड्डी आणि त्याच्या साथीदाराच्या विश्वासावर.

भारतभूमी स्वतत्र झाली ती फाळणीचे दुःख घेऊन. एकाच पवित्र भूमीचे दोन तुकडे करण्यात आले पाकिस्यानात हिंदू लोकावर जे अमानुष अत्याचार झाले त्यांचीच पुनरावृत्ती; स्वतत्र राज्याचे स्वप्न पहाणाऱ्या निझामाच्या राज्यात, मुसलमानांनी सुरू केली. मुसलमानांची सघटना बांधण्यात आली. त्याना लुटालूट, जाळपोळ, अन्याय, अत्याचार, खून याचे पद्धतशीर शिक्षण देण्यात आले. त्यांना शस्त्रे देण्यात आली. 'छू' करण्याचा अवकाश ही 'प्रशिक्षित कुत्री' निर्देशित ग्रामावर तुटून पडत. राक्षसी अत्याचाराचा मुक्त हैदोस घालीत. आणि जेव्हा त्याच्या राक्षसी वृत्तीस केलेल्या विध्वसामुळे समाधान मिळे तेव्हाच त्या गावापुरते हे कार्य थाबे. रझाकाराचा नेता कासीम रझवी त्याना सतत प्रोत्साहन देई. आपल्या भाषणातून त्यांना सतत उत्तेजन देई बहुसख्य हिंदूची सख्या घटविण्याचा हा एकुलता एक मार्ग तो पूर्ण शक्तीनिशी चोखाळीत होता.

येणाऱ्या सकटाची आणि रोजच्या रोज बिघडत चाललेल्या, परिस्थितीची रामरेड्डीला नीट कल्पना होती. त्याची पत्नी व मुले 'तेनाली' या स्वतत्र भारतातील ग्रामी रहावयास गेली. रामरेड्डीसही चलण्याचा आग्रह झाला. वर वर शांत दिसत असले तरी मुसलमान रामरेड्डीवर दात ठेवून आहेत याची अनेकांना कल्पना होती. परतु रामरेड्डीच्या जाण्याने रेणुकुटा निव्वळ असहाय्य झाले असते आणि म्हणून आपल्या साथीदाराना सोडून जाणे दिलेर रामरेड्डीना पसत नव्हते. त्याने तेथेच राहून ग्रामवासियाच्या सहाय्याने, परिस्थितीशी मुकाबला करण्याचे ठरविले. स्वत रामरेड्डी आणि त्याचा मोठा मुलगा रगारेड्डी गाव सोडून जाणार नाहीत हे कळून ग्रामवासियाना अत्यानद झाला. त्याच्या जिवात जीव आला.

रामरेड्डीने ग्रामवासियाना एकत्र करून कानावर येणाऱ्या रोजच्या भीषण अत्याचाराच्या कथा सागितल्या. आणि ग्रामरक्षक दलाची कल्पना सागितली. मरायचेच झाले तर बहादुरीने मरू, लढता लढता मरू, ग्रामरक्षण करता करता मरू असे सागितले. सर्वांनी आनदाने, उत्साहाने होकार दिला. रामरेड्डीने ५०–६० भरमार बंदुका गोळा केल्या. स्वत.साठी ट्वेल्व्ह बोअर बदूक विकत घेतली. 'कुळपाक'च्या पगडाल सत्तग्गा आणि वेचल्ला पुल्लारेड्डीना ग्रामवासियाना शस्त्रशिक्षण देण्यासाठी पाचारण केले. 'गावावर सकट आल्यास शेतीचे काम सोडून सर्वांनी गावाकडे धाव घ्यावी, रझाकाराच्या हालचालीवर सतत बारीक लक्ष ठेवावे, कोणत्याही कारणामुळे गाफील राहू नये' अशा स्पष्ट सूचना दिल्या. स्वतः तो एक उत्कृष्ट निशाणबाज होता. ग्रामरक्षक दलाचे नेतृत्व तोच करीत होता. आपल्या दुमजली घरासमोरील मोठमोठी झाडे त्याने तोडली. आता राजापेठकडून येणाऱ्या आक्रमकावर तो सहज गोळीबार करु शकत होता. रामरेड्डीने केलेल्या या सर्व व्यवस्थेमुळे आजुबाजूचे मुसलमान अधिकारी व रझाकार बेचैन झाले. केवळ रामरेड्डीमुळे या भागात रझाकाराना लूटमारीपासून वचित व्हावे लागत होते. त्याना हे शल्य टोचत होते. येनकेनप्रकारेण रामरेड्डीला 'उडविणे' त्याना आवश्यक वाटत होते. रामरेड्डीचे निःस्वार्थ नेतृत्व त्यांना असह्य झाले होते. हैदराबाद राज्याने भारतीय सघराज्यात सामील व्हावे आणि हैदराबाद राज्यात जबाबदार लोकतत्र अमल असावा ही रामरेड्डीची विचारसरणी त्या स्वार्थांध आणि राक्षसी रझाकाराना असहनीय होती.

रामरेड्डीची 'व्यवस्था' लावण्याची व्यवस्था सुरू झाली. 'फुलपाक'चे मुसलमान तहसीलदार, जगदेवपूरचे नायब अब्दुल रहेमान, राजापेठचे रझाकार नेता हाशिमअली आणि मुसत्यालचे रझाकार सालार छोटे मियां या चाडाळचौकडीने निर्णय घेतला, सशस्त्र सेनेसह रझाकारानी रेणुकुटयावर तुटून पडावे. आणि रामरेड्डी व त्याच्या साथीदारास जबरदस्त धडा शिकवावा.

माघ महिना. कृष्ण पक्षातील सप्तमी. शिशिर ऋतूचे आगमन झाले होते. हळुहळू उन्हाळा जाणवत होता. तरीही थडीचे अवशेष होते. रात्र उलटली होती. कृष्ण सप्तमीचा म्लान चद्र आकाशात बराच उच आला होता. बहुधा रात्रीचे दोन–तीन वाजले असावेत. 'रेणुकुटया'च्या पूर्व दिशेस असलेल्या पहाडावर त्या शात रात्री नेहमीप्रमाणे रेणुकुटयाच्या होऊ घातलेल्या गाधी मदिरासाठी वडुरलोक दगड फोडीत होते. एकाएकी एक वडुर उभा राहिला व भरवेगात वस्तीकडे निघाला. लवकरात लवकर पोचता यावे म्हणून तो सतत धावत होता. अतर बरेच होते. परतु त्या वडुराने धावून ते अतर थोड्याच वेळात कापले. वस्तीत तो आला. परतु त्याने आपला वेग कमी केला नाही. वस्तीतील कुत्र्याच्या भुकण्याकडे त्याने लक्ष दिले नाही. तो रामरेड्डीच्याच्या घरासमोर येताच थावला आणि त्याने जोरात हाक मारली. रामरेड्डी बाहेर आला. त्या वडुराने एका दमात सागितले, 'मालक, मालक कुलपाकेकडून दहा, बारा ट्रक्स आणि जीपगाड्या 'राजापेठ'कडे गेल्या. रझाकार कोणत्यातरी गावावर हल्ला करावयास बाहेर पडले हे निश्चित. त्याची तयारीही जय्यत दिसते आहे. आपल्या गावासाठीही ही तयारी असू शकेल मालक, रात्र वैऱ्याची आहे, जागे रहा!'

रामरेड्डी सावध झाला सशस्त्र ग्रामरक्षकासह तो 'राजापेठ'कडे जाणाऱ्या रस्त्याकडे वळला. दूर टेकडयावर त्याच्या गावाकडे येणाऱ्या वाहनाचा प्रकाश दिसला. रामरेड्डीने सर्वांना शांत केले. ती वाहने बेगमपेठकडे वळण्याची शक्यताही होती. डोळ्यात प्राण आणून सर्वजण त्या येणाऱ्या प्रकाशाकडे पहात होते. रेणुकुटयापासून एक दोन फर्लांगावर ती सर्व वाहने थाबली. त्या वाहनातून सशस्त्र सैनिक आणि रझाकार उतरत असल्याचे रामरेड्डीला त्या अधुक प्रकाशात दिसले. साधारणत. दोन–तीनशे सैनिक उतरले असावेत.

त्या सैनिकानी स्वत.ला विभागले आणि दोन दिशानी गावाला वेढण्यासाठी ते निघाले. इकडे एका ग्रामरक्षकाने रामरेड्डीच्या सकेता नुसार बार उडवला. नीरव शाततेत तो आवाज चहूकडे दणाणला. पहाडावरून त्याचे प्रतिध्वनी उमटले. परतु सैनिक वा रझाकारानी त्याची दखल घेतली नाही. त्याचे एक मात्र लक्ष 'रेणुकुटा' आहे याबद्दल आता सदेह नव्हता.

रामरेड्डीने आपल्या साथीदारासह स्वतःच्या वाड्यात प्रवेश केला वाडा दुमजली होता. आणि गच्चीवरून चौफेर गोळीबार करता येत होता. गावात बदुकीचा आवाज ऐकू आला होता. सकटाची जाणीव त्याना झाली होती. आणि ते सर्व ग्रामवासीय आश्रयार्थ वाड्यावर आले. लढाऊ साथीदारासमवेत रामरेड्डी गच्चीवर पोहोचला. त्याने मोर्चे बाधले. जागा नेमून दिल्या सर्वांना दिलासा दिला, हिंमत दिली.

रझाकार आणि सैनिकांनी वाड्यावर गोळ्याचा पाऊस पाडला. वाड्यावरून त्याना चोख उत्तर मिळाले. सतत ४–५ तास दोन्ही बाजूनी गोळ्याचा वर्षाव होत होता. छतावरील दोन रक्षक कामाला आले. रामरेड्डीने सर्वांना जोश दिला. 'मारा आणि मरा' म्हणून सागितल. या धामधुमीत शत्रूपक्षाचे १५–२० लोक आवारात शिरले आणि भिंतीचा आश्रय घेऊन उभे राहिले. रामरेड्डीने आत घुसलेल्या त्या लोकाना पाहिले मात्र त्याने त्याच्यावर हातबॉम्ब टाकला. भित कोसळली ती आश्रयार्थ आलेल्याना कायम आश्रय देऊनच. मध्येच रामरेड्डीच्या हाताला गोळी लागली. परतु हातावर फडके बाधून त्याही परिस्थितीत त्याने गोळीबार चालू ठेवला. शत्रू-पक्षाने हाय खाल्ली त्यानी गोळीबार बद केला. आणि पुढील कार्य-वाहीसाठी विचारविनिमय सुरू केला.

शत्रू आघाडीवर एका तासापेक्षाही जास्त वेळ शातता होती. एकही गोळी शत्रूने झाडली नव्हती. या भयाण शाततेने वातावरणात एक असह्य ताण निर्माण झाला होता. दुपारचे अकरा वाजले होते. शत्रूपक्षाकडून काहीच हालचाल नव्हती रामरेड्डीनी आपली बदूक जरा बाजूला ठेवली आणि आपले डोके उचावून तो बाहेर पाहू लागला. इकडे एक सैनिक, मधल्या काळात*रामरेड्डीच्या वाड्या-पासून साठ-सत्तर मीटर अतरावरील एका उच लिंबाच्या झाडावर चढून "लक्ष्याचा' नेम धरून बसला होता. रामरेड्डीचे डोके वर आल्याचे त्याने पाहिले. रामरेड्डीला त्या सैनिकाची कल्पनाही नव्हती. आपला मृत्यु त्या सैनिकाच्या रूपाने दबा धरून बसलेला आहे त्याची त्याला अधुकशीही कल्पना नव्हती. रामरेड्डीच्या मस्तकाचा वेध घेण्यासाठी निघालेल्या गोळीने आपले काम चोख बजावले राम-रेड्डीच्या मस्तकाचा भेद त्या गोळीने केला आणि रामरेड्डी खाली कोसळला आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे ग्राम रक्षणासाठी लढताना त्याने प्राणार्पण केले. रामरेड्डी धन्य झाला.

रामरेड्डी पडताच ग्रामरक्षक दलाचे पानिपत झाले. मुस्लिमाना चेव आला. ग्रामरक्षकानी हिंमत ठेऊन टक्कर घेतली असती तर–? रामरेड्डी मेला, हे रझाकाराना समजावे आणि त्यानी पुढील कार्यवाही थाबवावी म्हणून रामरेड्डीचे प्रेत वरून खाली टाकण्यात आले. परतु रझाकाराना आता उन्माद चढला होता. सूडाची भावना अतृप्तच होती. त्यानी त्या दिवशी जाळपोळ, अत्याचार, खून आदीचा जो नगा नाच केला त्याला सीमा नाही.

आकाशवाणी हैदराबादवरून बातमी प्रसारित करण्यात आली. की रेणुकुटा गावी सत्तर-ऐंशी कम्युनिस्ट आणि त्यांचे नेते रामरेड्डी मारले गेले. सरकार पक्षाची विशेष हानी झाली नाही. परंतु एका वृत्तपत्रानुसार एकशे-अठरा सहकारी सैनिक रामरेड्डीशी झालेल्या लढाईत बळी पडले.

चिंतापुडी रामरेड्डीचे वीरमरण विसरले जाऊ शकत नाही. जाऊ नये. नळगोडा जिल्ह्यातील घराघरातून त्याच्या पराक्रमाच्या कथा सागितल्या जातात. बाल सतोषोलु नामक भिक्षुकचारण त्याच्या बलिदानाची कथा गावोगाव जाऊन, गाऊन ऐकवीत असतात. लोकाना विस्मरण होऊ नये, आपला हा पराक्रमाचा इतिहास नजरे-आड होऊ नये म्हणून त्याचा हा प्रपच. रामरेड्डी मेले नाहीत देशा-साठी मरणारे मरत नसतात. ते अमर होतात आपल्या सौभाग्य-वतीना अखड सौभाग्याचे लेणे देऊन ते स्वर्गारोहण करतात.

शहीद हुआ है प्रीतम जिसका बेवा नही सुहागन है !

□


# माणूस दिवाळी अंक किंमत रुपये सहा

- दोन नोव्हेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही.
- नऊ नोव्हेंबरचा अंक दिवाळी अंक म्हणून चार । पाच नोव्हेंबरच्या सुमारास प्रसिद्ध होईल.

**वर्गणीदारांसाठी**

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी ३१ ऑक्टोबर ७४ पूर्वी दीड रुपया पाठवावा

- अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू.
- ज्यांची वर्गणी ९ नोव्हेंबरपूर्वी संपत असेल त्यांनी वर्गणी लगेच रवाना करावी. म्हणजे त्यांना दिवाळी अक पाठवता येईल.
- जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी ३१ ऑक्टोबर ७४ पूर्वी तसे कळवावे. —व्यवस्थापक

# ही माझी अल्पशी कमाई



सौ. उज्ज्वला पिंपळखरे

आगगाडी गोरखपूर स्टेशनात स्थांबल्याबरोबर मी आपली छोटी ट्रंक हातात घेऊन झटकन् प्लॅटफॉर्मवर उडी मारली. इथं मला कोणी भेटण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच. तेव्हा इकडे तिकडे कुठेही न पहाता मी स्टेशनबाहेर पडून टांगा स्टॅन्डकडे वळलो.

'कहा जाना है?' एका टांगेवाल्यानं मला विचारलं!

माझ्या खिशातला तारेचा फॉर्म बाहेर काढून त्यावर लिहिलेल्या अक्षरांवर मी नजर वळवली आणि टांगेवाल्याला सांगितलं 'गोरखपूर सिविल अस्पताल.'

'बैठिये साब, मैं आपको बराबर ले चलूंगा!'

'मी त्याच्या टांग्यात बसलो. टांगेवाल्याने त्याच्या घोड्याला चुचकारून वळविलं आणि आमचा टांगा भरधाव जाऊ लागला. गोरखपूरचा बाजाराचा चौरस्ता, महारानी हाईस्कूल, डाकघर ओलांडून गेल्यावर मोठं माळरान सुरू झालं! मला स्वस्थ रहावेना. 'कहां है सिविल अस्पताल!' मी टांगेवाल्याला विचारलं!

'थोडाही दूर है...' देखिये, यह सामनेवाली कोठी दीखती है न, वह अस्पताल है' त्याने टांगा थांबविला. रस्त्याला लागूनच एक प्रवेशद्वार होतं! त्यावर 'गोरखपूर सिविल हॉस्पिटल' हे वाचल्यावर मी त्या टांगेवाल्याचे पैसे देऊन हॉस्पिटलच्या इमारतीत शिरलो.

हे हॉस्पिटल बैठ्या बराकीवजा इमारतीत वसलेलं होतं! मला तिथं आलेला पाहून एक शुभ्र वेषातली नर्स समोर आली.

'धन्नाबाई नाम की एक पेशंट यहां है न? २-४ दिवसापूर्वी मला ही तार मिळाली. धन्नाबाई सिरीयस. स्टार्ट इमिजिएटली—गोरखपूर सिविल हॉस्पिटल! म्हणून मी पहायला आलो. भूतानमध्ये ज्योत्सोमाला आमचं फाईव्ह वन टू युनिट आहे. तिथं मी नोकरीला आहे. मी थोडक्यात सांगितलं.

'आमच्या डॉक्टरनीच ही तार पाठवली. तुम्हीच धन्नाबाईचा मुन्ना ना? ती सारखी तुमची वाट पहात होती.' नर्सनं मला सांगितलं!

...ज्योत्सोमातल्या गेल्या ४-६ दिवसातल्या घटना मला आपोआप आठवल्या. मी गार्ड ड्यूटी करीत असताना आमच्या कंपनी कमांडर सुमन साहेबानी बोलाविलं!

मी त्यांच्या तंबूत गेलो, सॅल्यूट करून त्यांचा हुकूम काय आहे या अपेक्षेने उभा राहिलो.

कॅप्टनसाहेब बोलू लागले, हे बघ लालसिंग, आत्ताच गोरखपूर सिविल हॉस्पिटलकडून आपल्या मोहनजितच्या नावावर तार आली आहे. 'धन्नाबाई सिरीयस स्टार्ट इमिजिएटली.'

मला कळेना. 'ही धन्नाबाई कोण? मी काय करू शकतो?' मोहनजित बॅचलर आहे. धन्नाबाई त्याची आई आहे. महिन्यापूर्वीच तो मला म्हणाला होता, त्याची आई गोरखपूर सिविल हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केली आहे. त्यानं अॅडव्हान्स पगार घेतला होता, ते असो. सध्या मोहनजित पेट्रोलिंग करायला सरहद्दीवर गेला आहे. त्याला मी निरोप पाठवतो दुसऱ्या एका पार्टीबरोबर! पण कधी भेट होईल याचा नेम नाही. तू राणीखेतला जातच आहेस ना रजेवर?' कॅप्टन सुमनसाहेब मला म्हणाले.

'हो, हो.' मी म्हणालो.

'तर मग गोरखपूरला जरा थांब. धन्नाबाईला भेटून सांग की मोहनजित येतच आहे.' ते म्हणाले....

पण हे सारं सांगावं का या नर्सला! माझ्या मनात गोंधळ उडाला होता.

'चला आपण तिकडेच जाऊ या! तिनं ध्यास घेतला होता, मेरा मुन्ना कब आयेगा.'

'सिस्टर, मी मोहनजित नाही. त्याच्याच फौजी युनिटचा त्याचा एक सहकारी मित्र आहे. मी फक्त सांगायला आलो की मोहनजित कधी येईल हे आत्ताच सांगता येत नाही पण तो येतच आहे.' मी सांगितलं!

नर्सने एकवार माझ्याकडे पाहिलं! 'धन्नाबाईकी केस बहोत सिरीयस है! हार्ट बहोत कमजोर हो गया है! वह थोडे

टाईमकी है! चलो.' तिनं प्रसंगाचं गांभीर्य ओळखलं होतं. 'तुमही मुन्नाके जगह आये हो.'

आम्ही दोघं बराकीच्या व्हरांड्यातून चालत एका मोठ्या वॉर्डात आलो. तिथ सर्वच पेशंट स्त्रिया होत्या. एका कोपऱ्यातल्या चारपाईवर धन्नाबाई डोळे मिटून आडवी पडलेली होती. पायापासून ते गळ्यापर्यंत चादरीखाली पहुडलेला तिचा देह म्हणजे हातापायाच्या काड्या झालेला एक लहान-खुरा सागाडा होता. तिच्या चेहेऱ्यावर आजारी पाढरपणाची भकास कळा आली होती, तरीसुद्धा तिचे काळेभोर मोठे डोळे, सरळ तरतरीत नाक, मोहक जिवणी हे तिच मूळच सौदर्य तिच्या आजारपणातही लपून रहात नव्हत? तरुणपणी ही धन्नाबाई फार सुरेख असली पाहिजे अस तिला पहाता-क्षणीच माझ्या मनात आल! पण ही वेळ तिच्या रूपाचा विचार करण्याची नव्हती.

'माताजी देखो तुम्हारा मुन्ना आया,' नर्सने तिच्या कानाजवळ जात सागितल!

धन्नाबाईन नर्सकडे व माझ्याकडे आळी-पाळीने निर्विकारपणे पाहिले. तिच्या नजरेत आजारणातला शून्यपणा होता

'माँ, मैं आया हूँ ज्योत्सोमासे,' मी बोलायचा प्रयत्न केला. तिच्याजवळ जरा वाकून तिच्याकडे मी हसून पाहिलं!

'मेरा मुन्ना,' तिन मोठ्या कष्टान अस्पष्ट स्वरात उच्चारण्याचा प्रयत्न केला. तिच्या चेहेऱ्यावर किंचितसे स्मित उमटले. माझ्या पाठीवरून तिने हात फिरविला... पहाता पहाता तिचे डोळे अश्रूनी भरून आले. बोलण्याचा प्रयत्न करूनही तिला बोलवत नव्हते. नर्स निघून गेली.

धन्नाबाईनी उशीखाली चाचपडल्यासारख करून एक छोटीशी पुरचुडी बाहेर काढली आणि माझ्या हातात दिली. मी पुरचुडी उघडली. त्यात कागदाची एक छोटी घडी होती ती उघडून पाहिल्यावर मला एक सोन्याची अगठी मिळाली. त्या कागदावर 'मुन्ना के लिए' अशी वेडीवाकडी अक्षरे कोणीतरी लिहिलेली होती.

मी ती अगठी पाहिली, कागदावरची अक्षर वाचली. मी जरा विचारात पडलो. ती पुरचुडी मी उचलून स्वत जवळ ठेवावी का धन्नाबाईजवळच द्यावी? मुन्ना लवकरच येत आहे असं सांगावं का? समजा मी ती अगठी घेतली नाही तर मी तिचा मुन्ना नाही असच दिसून येईल; मग कदाचित तिला मुन्ना भेटल्याच समाधानही मिळणार नाही.... मी विचारात पडलो खरा, पण अखेरीला ती पुरचुडी माझ्या खिशात ठेवली. धन्नाबाईच्या चेहेऱ्यावर समाधान दाटले होते. तिन थकवा वाटून डोळे मिटून घेतले.

त्याच सुमाराला एक म्हातारा काठी टेकीत धन्नाबाईच्या तिथ आला तो आणि मी एकमेकाकडे पहात राहिलो. त्याचे डोळे गारगोट्याप्रमाण निस्तेज वाटले. उगीचच जास्त बोलण नको म्हणून मी धन्नाबाईकडे एक नजर टाकून तिथून निघालो. मघाची नर्स औषधाचा कप घेऊन येताना मला भेटली. मी तिला विचारल, 'आता तिथ एक म्हातारा आलाय्, तो बघ. तिथ उभा आहे.' तो कोण?

'तो ना तुझा बाप,' ती म्हणाली, व चालू लागली. मीही ट्रंक घेऊन हॉस्पिटल-बाहेर पडलो.

दुसरे दिवशी रविवार होता सकाळी नऊ वाजता मी तिला भेटायला परत त्याजागी गेलो, आणि पहातच राहिलो. पाढऱ्या चादरीन तिच शरीर झाकलेल होत. तिचा लहानसर देह चादरीखाली लपून गेला होता. मी समजून चुकलो.

काय विचित्र योगायोग! आमच्या कॅप्टनसाहेबानी मला फक्त निरोप सागण्या-साठी इथ जा म्हटल म्हणून आलो....हिची ही अखेरची स्थिती ओळखूनच पुढल सारं जे घडत गेल ते पहात राहिलो. मी येण्या-चीच ही बाई जणू डोळ्यात प्राण आणून वाट पहात होती माझी भेट झाली, ती पुरचुडी देण्यासाठी तिचे प्राण घुटमळत होते. तिच ते काम झाल आणि तिच आयुष्य सफल! कधी कधी अनाकलनीय घटना घडतात तेव्हा वाटत, माणूस म्हणजे नियतीच्या हातातल एक खेळण आहे

माझे हे विचार मनात चालू असतानाच कालच्या नर्सन येऊन मला धन्नाबाईच्या डिसचार्जसबधीचा कागद दिला व त्याबरो-बर औषधाच्या बिलाचा कागद दिला. बिलाचे पैसे मी तिथल्यातिथ भरले.

धन्नाबाईला फुलाचा हार घालण्यासाठी मी तिथल्या पोऱ्याला पैसे दिले. त्यानं झटकन् हार आणला. मी तो तिथं तिच्यावर घातला. नतर तिला स्ट्रेचरवर घालण्यात आल आणि कोपऱ्यावरच्या एका खोलीत ठेवण्यात आल! मला अकारण उदास वाटत होत.

धन्नाबाईची नातलगमडळी जमण्याची फारशी वाट पहावी लागली नाही. तिचा म्हातारा नवरा इतका गलितगात्र होता की तो आलाच नाही. त्याची चार-सहा गावकरी माणस जमून कोडाळं करून ती आवारात समोर बसली होती. हॉस्पिटलचा मघाशी फुलाचा हार आणून देणारा पोऱ्या माझ्या-बरोबर होता. मी या कोडाळ्याजवळ जाऊन चौकशी केली, 'आप सभी रिश्तेदार हैं? धनाबाईको पेहेचानते हैं?'

नही, नही अशा अर्थी त्या सर्वांनी माना हलविल्या. त्याच्यातला एकजण काहीतरी खेडवळ भाषेत बोलला. आम्ही रिवाज म्हणून जमलो आहोत असा त्याच्या बोल-ण्याचा मी मनाशी अदाज केला. मीच पुढाकार घेतला. तो पोऱ्या, जमलेली ती मडळी या सर्वांनी मिळून अत्यविधीची


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील
शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०

तयारी केली; खर्चाचा वाटा मी उचलला. आम्ही सर्व क्रिया आटोपून माघारी आलो तेव्हा मला एका मोठ्या जबाबदारीतून पार पडल्यासारखं वाटलं.

आता त्या गावात माझं काय काम होतं ? मी स्टेशनवर येऊन आगगाडीची चौकशी करीत असताना कोणीतरी ‘ लालसिंग ’ अशी हाक मारली. मी सहज वळून पाहिलं. मोहनजित उभा होता. नुक्ताच आगगाडीतून तो उतरला असावा.

एकमेकांना पाहून आम्ही दोघांनी भावनातिशयाने एकमेकांना मिठी मारली. दुसऱ्या क्षणी आम्ही दूर होऊन एकमेकांकडे पहात स्तब्ध राहिलो. मोहनजितने बोलायला सुरुवात केली. ‘ माँ कैसी है ? तुमने मेरे लिए बहोत कष्ट उठाये लालसिंग ’ मोहनजितचा आवाज भरून आला होता.

मला गेल्या दोन-तीन दिवसातल्या घटना आठवल्या. ते सर्व याक्षणी त्याला सांगण्यासारखं नव्हतं ! सांगून काही उपयोग नव्हता. पण मला एकच आठवलं ! खिशातून ती पुरचुंडी काढून मी त्याला दिली. ‘ माताजीने तेरे लिए रखी थी ! लो भैय्या ! ’

मोहनजित पहातच राहिला. मी त्याचा निरोप घेण्याच्या दृष्टीनं त्याला म्हणालो, मैं छुट्टीपर जा रहा हूँ ! वह देखो मेरी रेलगड्डी आ रही है ! अच्छा, फिर वापस युनिटमें मिलेंगे ! ’

मी पलीकडच्या फ्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी वळलो, गाडीत बसलो.

खरं म्हणजे माझा आणि मोहनजितचा परिचय अगदी गेल्या चार महिन्यातलाच होता. मी त्याच्या नात्यातला नव्हतो की धन्नाबाईच्या ओळखीचा नव्हतो. केवळ कॅप्टन सुमनसाहेबांच्या सांगण्यावरून गोरखपूरला धन्नाबाईला भेटून पुढे राणीखेतला जाण्यासाठी निघणार होतो. पण अचानकपणे कल्पना नसताना मला गोरखपूरला दोन दिवस मुक्काम करावा लागला होता; खर्चाचा आणि जबाबदारीचा वाटा उचलावा लागला होता....हे सारं करताना मला एकच समाधान मिळालं होतं ! धन्नाबाईला तिच्या अखेरच्या क्षणी मी शांत समाधान – मन्ना भेटल्याचं समाधान, लाभू दिलं होतं. मोहनजितच्या आयुष्यातल्या एका नाजुक पण अत्यंत विचित्र प्रसंगी मी मोहनजित नसूनही त्याची उणीव भासू दिली नव्हती. हीच माझी अल्पशी कमाई ! □



# ओव्हरकोट

लेखक : कै. बलराज सहानी  अनुवादक : रवी पारपिल्लेवार

इकबाल फार चितेत होता. त्याचे कपडे चागले नव्हते. कोट फार जुना अन् घाण झाला होता, तो साफ करण्यासाठी मोठ्या सकोचान त्यान शेजारून ब्रश आणला होता. बुटांना पॉलिश केले होते, ते देखिल टाचेवर फाटले होते. पँटचे खिसे उदरानी कातरलेले होते. शर्टची कॉलर पण फाटलेली होती. 'आपल्या सारख्या गरिबाकडे कोण पहाणार?' असा विचार करून त्याने कपडे घातले अन् तो गोल्फरोडकडे रवाना झाला. अशा अवतारात जर तो मालरोडवर गेला असता तर कॉलेजच्या पोरानी त्याची नक्कीच टर उडवली असती.

तो शहालगी दरवाजाच्या गर्दीत एखाद्या साहेबाप्रमाणे भरभर चालत होता. टांगेवाले आशेन त्याच्या जवळ जात होते. भिकारी, तो जवळ येताच आपले हात समोर करून उभे रहात. *पण त्या टांगेवाल्याना अन्* भिकाऱ्याना काय माहीत की इकबालदेखील त्याच्या सारखाच एका पडक्या झोपडीचा *अन मोडलेल्या खाटेचा मालक आहे.* ह्याच खाटेवर बसून तो कल्पना विश्वात तरगत असे.

आज आपल्याला काय होत आहे, हे त्याच त्यालाच कळत नव्हत. चेहऱ्यावर चिता अन् उल्हास होता. आज कर्नल कपूरनी त्याला घरी बोलावलं होत. आपल्याला कर्नल कपूरन बोलावल आहे ह्याचा उच्चार त्यानं कोणाजवळ केला नव्हता, कारण नेहमीच्या अनुभवावरून शेवटी त्यालाच लज्जित व्हाव लागत होत. आतापर्यंत ज्या ज्या गोष्टीचा त्यान इतरापाशी उल्लेख केला होता त्या त्या बाबतीत त्याला अपयशच आल होत, परतु आजचा दिवस चागला होता. 'कोणीतरी निश्चित माझ्याबद्दल कर्नलपाशी रदबदली केली असावी! वेतन एकशेवीस रुपये. आई, बाप प्रसन्न होतील. जन्माजन्माचे क्लेश अन् दु:ख दूर होईल. जमलच तर आज रात्री कुसूमला पत्र लिहू या, साऱ्याचा विरोध सहन करून तिच्याशी संसार थाटू या! असा विचार करीत तो लॉरेन्स गार्डनपाशी आला. रात्र झाली होती. थडी कडाक्याची होती. हाताची बोट थंडीन ताठरली होती. अशा 'थड' अवस्थेत कर्नलशी काय बोलणार? म्हणून तो हात काखेत दाबून आणखी वेगान चालू लागला.

बगलीत पोहोचल्यावर आपण टाग्यातून आलो, अस कर्नलला वाटावं म्हणून त्यान रुमालान बूट साफ केले, केसावरून हात फिरवला अन् तो आत शिरला. दिवसा आला असता तर चपराश्यानं दोन तीन तास बाहेरच ठेवल असत त्यानं दारावर हळूच थाप मारली. कर्नलने स्वत: दार उघडून त्याच स्वागत केल. आभाराच स्मित करीत इकबालन आत कर्नलच्या मागोमाग प्रवेश केला.

बाहेरच्या थडीपेक्षा आतील हवामान *गरम होत. हॉलमध्ये शेगडी जळत होती.* शेगडी जवळच कर्नलची कुटुबीय मडळी बसली होती.

'*एवढ्या थडीत तुम्ही ओव्हरकोट न* घालता आलात? खरच तरुण रक्त फार गरम असत नाही?'—कर्नल.

इकबालन स्वत.लाच मनात दोन शिव्या मोजल्या. 'कोणाकडून ओव्हरकोट घेतला असता तर! अस त्याला वाटल. पुष्कळदा इकबालन वरिष्ठावर 'इंप' मारण्यासाठी फर्स्ट मधून प्रवास केला होता. बऱ्याचदा हॉटेलमध्ये बसून बीअर सिप केली होती.

चेहऱ्यावरचे भाव लपवीत तो म्हणाला 'एका मित्रान नेला, अजून परत केला नाही त्यान?'

कर्नलकडून कशाप्रकाच्याही सहानुभूतीची त्यान अपेक्षा केली नव्हती. स्वत.च्या गरिबीमुळं तो हेच विसरला होता की उच्चपदस्थाना देखिल हृदय असते.

कर्नलनं आपल्या कुटुबियाची ओळख करून दिली. तो जवळच एका खुर्चीवर बसला. कर्नलच्या नम्रतेन, आपुलकीन तो एवढा भाळला की, नोकरीची भीक मागण्यासाठी आपण येथे आलो, हे देखिल तो काही काळ विसरला. कर्नलची कुटुबीय मडळी आता दुसऱ्या खोलीत गेली, हॉलमध्ये कर्नल अन् इकबालच होते कर्नलन त्याला एक 'शेरी' चा ग्लास ऑफर केला.

'तुमच स्टूडन्ट करिअर एवढ Bright असून देखिल तुम्ही फॉरेनला का नाही गेलात? कर्नल

'फॉरेनला गेलोही असतो, मला surgery मध्ये फार आवड आहे. परतु माझी आर्थिक बाजू पण चांगली नाही. वडील मदत करू शकतात पण ते मला waster समजतात. मी त्याना दाखवू इच्छितो, की मीपण उभा राहू शकतो, अन् विशेष म्हणजे मला कुणाची भीक अन् बोलणी नकोत—' इकबालनं समर्थन केल.

इकबाल बोलत राहिला. *कर्नल त्याला* एखाद पुस्तक उलगडाव तस उलगडीत होते. इकबालला स्वत:ला कळल नाही की तो *इतका बोलका कसा झाला! तो स्वत.ला* आवरू शकला नाही. जीवनातील अडचणीची बेरीज, वजाबाकी झाली. जवळची प्रशस्ती-*पत्र दाखवायच देखील गप्पांमध्ये राहून गेल.* स्वत च भविष्यातील अस्तित्त्व सॉलीड करण्याचा तो प्रयत्न करीत होता. इकबालला कर्नलचा चेहरा सौहार्दपूर्ण अन् सूक्ष्मदर्शी वाटला.

गप्पा सपल्या. कर्नलन त्याला नोकरीबद्दल एका महिन्यात कळवायच आश्वासन दिल. इकबाल कर्नलशी हस्तादोलन करीत म्हणाला, 'नोकरीची काळजी नाही. तुमच्या सारख्या माणसाचा सहवास मिळाला हे काही कमी नाही!' अस म्हणून तो जाण्यासाठी उठला.

'बाहेर थडी फार आहे. माझ्याजवळ दोन ओव्हरकोट आहेत, एक आतापुरता घेऊन जा. उद्या ऑफीसमध्ये द्या पाठवून!' कर्नल आपला मित्रभाव प्रकट करीत म्हणाले.

इकबालला हा तर स्वत.चा आत्मसन्मान

वाटला. नोकराने कोट आणून दिला. इकबालला कोट घालण्यासाठी स्वत. कर्नल मदत करीत म्हणाले, 'वा! हा तर तुम्हाला छान फिट होतो.'

इकबालने कोटाची कॉलर वर करून हात खिशात टाकले अन् तो परत घराकडे चालू लागला. जसा एखादा सैनिक रात्रभर विश्राम करून परत सकाळी युद्धक्षेत्राकडे जावा!

थोडं दूर गेल्यावर इकबालच्या हाताला कोटाच्या खिशात नाण्याचा स्पर्श झाला. त्या घडीत तो 'स्पर्श' त्याला फार सुखद वाटला. त्यान आश्चर्याने सारे कोटाचे खिसे चाचपले, त्याला त्या कोटात एक पाच रुपयाची नोट अन् काही नाणी सापडली. त्याला कर्नलचा स्नेहभाव, मित्रप्रेम, सहानुभूती आठवली अन् तो परत कर्नलकडे जाऊ लागला.

बगल्यावर पोहोचल्यावर त्यान दारावर खटखट केली.

'come in!' कर्नलचा शुष्क आवाज–इकबाल आत गेला.

'हे पैसे त्या कोटात होते–' इकबाल पैसे परत करीत म्हणाला.

'पण हे पैसे ह्या कोटात कुठून आले?... हा तर...फार जुना कोट आहे, मी वापरीत नाही...बर, ठीक आहे, Thank you!' – कर्नल. इकबाल परत वळला अन् दार बद झाले.

कर्तव्याची आग विझवून इकबाल परत चालू लागला. त्याच्या मनात शका आली... 'दुसऱ्या भेटीत निश्चित अतर होत उगाच परत गेलो...पण मी तर कर्तव्यतत्परता दाखवली...नाही.. नाही . विस्मय असावा ...पण परत जाण अनावश्यक होतं. पैसे उद्या पण देता आले असते...नसते परत केले तरी काय झाल असत!.. *त्याना* तर माहीतच नव्हत...छे...छे अस कस... जीवनात काही नियम पाळायलाच हवेत... कदाचित...हा त्याग मला नोकरी मिळवून देईल.' विचित्र विचार त्याच्या डोक्यात येऊ लागले.

'पाच रुपयात एक पिक्चर...फार दिवस झालेत...बिअर प्यालो असतो...पाच रुपयान कर्नलच्या श्रीमतीत काय फरक पडला असता...नौकरीच देव जाणे...हे मोठे लोक उगाच गरिबाशी खेळतात अन् मजा पहातात...मी तरी किती मूर्खासारखा बोलतच राहिलो...अशा भावुकतेन कोणी श्रीमत कधी प्रेरित झाला आहे? उद्या परत सूर्य हजार अडचणीचे किरण घेऊन उगवेल ...नोकरी तर मिळेल...नाही तर घरी कशाला बोलावल असत...दुनियेतून अजून कृपाभाव सपला नाही.

कधी स्वतला आश्वासित तर कधी शिव्या देत तो चालत होता. रस्त्यावरील भिकाऱ्याच्या हाताकडे पाहून त्याच विचारचक्र परत फिरू लागल. 'पाच रुपयात निदान तीन भिकारी जेवले असते, बिचाऱ्याचे आशीर्वाद तरी मिळाले असते. ते...ते... रुपये कोणाच धन नव्हत...ते तर फुलाप्रमाणे *फुलण्यासाठी ह्या जगात आले*...पण मी त्याना परत कैदेत टाकल...पाच रुपयात महिनाभर घरात विजेचा दिवा...नाहीच काही तर दोन टाय आले असते...'

अशा विचारातच तो एका हॉटेलात शिरला. पोटभर जेवून तो काउटरपाशी आला. पैसे देण्यासाठी त्याने खिशात हात घातला अन्...त्याचा हात रिकामाच बाहेर आला. त्यान आपल्या रिकाम्या हाताकडे पाहिल...तो आठवू लागला तेव्हा...सोनेरी स्वप्नावस्थेत आपण आपला खजिना कर्नलपाशी रिता केला, ह्याची त्याला जाणीव झाली. □

---


पिंगे यांच्याबाबत प्रथम लक्षात येते ती त्याची अत्यत पृथगात्म व व्यक्तिसपन्न अशी भाषाशैली आजच्या मराठी साहित्यात व पत्रव्यवसायात शैलीकार तसे मोजकेच आहेत. पु. ल देशपाडे, दुर्गा भागवत, कृ. द. दीक्षित अगर अप्पा पेंडसे ही सहज आठवणारी काही नावे. याच्यापैकी व्यक्तिचित्रण बहुतेकानी समर्थपणे हाताळले आहे. पिंग्यांची मराठी पोसलेली तर आहेच, परतु तिला स्वत.चे असे एक फाकडे वळण आहे. त्याच्या हातची कोणतीही चार वाक्ये सलग वाचा; हे वळण जाणवलेच पाहिजे! खेरीज कोणत्याही चागल्या शैलीकाराच्या अगी असणारे गुण · शब्दाच्या सूक्ष्म अर्थच्छटाची जाण, चित्रमयी शब्दयोजना, वाक्यरचनेची आगळी लपेट इ.

–ज्ञानेश्वर नाडकर्णी
रविवार, महाराष्ट्र टाइम्स

# शतपावली

रवींद्र पिंगे । मूल्य : रुपये दहा । राजहंस प्रकाशन

आगामी

**आनंदाच्या दाही दिशा**

प्रवासवर्णन

पुस्तके

## शब्दजंजाळात हरवलेली कादंबरी

# सागरा प्राण तळमळला

प्रा. ग. भा. जोशी

'मुहूर्तं ज्वलित श्रेय' नच धूमायित चिरम्!'

या उक्तीप्रमाण स्वातत्र्यवीराच जीवन *प्रज्वलित झालेल्या अग्नीसारख* धगधगत आहे. त्याचप्रमाण वीजेच्यालोळासारख दीप्तीमान आहे. झझावाती वादळासारख गतीमान आहे. अस हे धगधगीत, रसरशीत, आवेगपूर्ण *बहुविध, बहुरगी, बहुढगी जीवन*– जे जीवन महाकवीच, शब्दप्रभूच, सुधारकाच, युयुत्सू योध्याच, वैज्ञानिकाच, तत्वचिंतकाच, कृतीशूरवक्त्याच, एका कालखडाच सारथ्य करणाऱ्या अलौकिक नेत्याच जीवन साकल्यान आणि सामग्ऱ्यान शब्दाकित करण हे सामान्याच कामच नव्हे! सिंधू सागराच्या सखोल तळाचा सूक्ष्मतेन वेध घेण्याची ज्याला दृष्टी आहे, महाप्रपाताच्या गतीचा ज्याला बोध घेता येतो त्यान या विषयाला स्पर्श करण्याच धाडस कराव अस राहून राहून वाटत

### त्रिविधस्तर

स्वातत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर याच्या अन्तर्मनाचा चिकित्सक आणि सहृदयतेन ठाव घेण, त्याच्या जीवन कृतीच्या विविध पैलूचा अभ्यास करण हे 'अतिशय अवघड तर खरच पण त्याच जीवन चित्रित करीत असताना त्याच्या जीवनाशी अत्यत निगडीत अशा पातळ्याचा,– स्तरांचा विचार करण हे अगत्याच आहे.

(१) स्वातत्र्यवीराच वैयक्तिक जीवन कौटुबिक परिस्थिती, हा एकस्तर (२) तर त्याच्या पूर्वकालीन, समकालीन परिस्थितीत हिन्दुस्थानातील विविध व्यक्ती, सस्था, राजकीय, वैचारिक, सामाजिक विचार प्रवाह हा दुसरा स्तर आणि (३) ज्या शक्तीबरोबर सावरकरानी जीवनभर झुज दिली त्या आतरराष्ट्रीय क्षेत्रातील साम्राज्यवादाचा प्रखर विरोध हा तिसरा स्तर! या तीन स्तराची गुफण वेधक, रोचक आणि समग्र पद्धतीन लेखकाला करता आलेली नाही. हा मुद्दा अधिक विस्ताराने माडायचा झाला तर अस म्हणता येईल की,

(१) २० व्या शतकाच्या प्रारभी आणि सावरकराच कार्य जेव्हा जोमात, जोशात होत अशा कालखडात गाधीजीच्या तत्वज्ञानाने भारावून गेलेल्या, विचार प्रवाहान त्याना केलेला विरोध, आगपाखड, याचा सघर्ष, पीळ, कादबरीत समर्थपणे व्यक्त होण आवश्यक होत.

(२) सावरकराच जीवित तत्त्वज्ञान हिन्दुत्व निष्ठाना, हिन्दुसभेलाही पुढ पचवता आल नाही ही माझ्या मते त्याच्या जीवनातील दारूण शोकान्तिका आहे जे त्याच्या विचारधनावर पोसलेले, ज्यानी त्याच्या विचाराशी जवळीक, सोयरिक केली अशा नाही सावरकर समजून घेता आले नाहीत हा धागाही कादबरीत निश्चितच हवा होता. पण लेखकान ४०० पानापेक्षा अधिक लेखन करूनही. सावरकर अदमानातून मुक्त झाले येथपर्यंत कादबरीचा प्रपच केल्यामुळे सावरकर कथन एकागी, नीरस, बेडौल आणि तोल ढळल्यासारख वाटतं.

(३) कौटुबिक जीवन– 'पत्नी बधु, येसुवहिनी याची ही भावनिक आदोलने लेखकाने हाताळली असती तर कादबरीचे स्वरूप अधिक हृद्य झाले असते' हा प्रस्तावनाकाराचा अभिप्राय यथार्थ वाटतो शिवाय लेखकाने चरित्रनायकाच्या कौटुबिक जीवनातील तरलभावना, रागलोभ, आशा आकांक्षा अपेक्षा चित्रित केल्या असत्या तर हे व्यक्तीत्व अधिक सपन्न, उठावदार आणि आशयघन झाले असते. सावरकर एक मनुष्य म्हणून त्याचं चित्रण अधिक गडद आणि भावस्पर्शी व्हायला हव होत. अर्थात् वडील, येसूवहिनी, बाबा, प्रभाकर याच्या अनेक घटनाशी लेखक समरस झाला आहे.

(४) त्याचप्रमाण स्वातत्र्यवीरांचा मित्रपरिवार, क्लबातील सदस्य, मित्रमेळा यातील त्याचे सहकारी, मित्र याचे स्वभाव लेखन अधिक यथार्थ व्हायला हवं होत. त्याचप्रमाण सावरकरांना ज्याच्याबद्दल नितात आदर आहे श्रद्धा आहे, ज्याच मार्गदर्शन त्यांनी शिरोधार्य मानलं त्या लोकमान्य टिळक, शिवरामपत पराजपे याचा सहवास अधिक उठावदार आणि परिणामकारक रीतीनं चित्रित करायला हवा होता.

### राजकारण आणि समाजकारण

स्वातत्र्यवीराच्या जीवनकार्याचा आढावा घेताना प्रस्तावनाकारानी लेखकाची भलावण करीत असताना अस आहे की, 'लेखकाचा राजकारणाचा अभ्यास नसेल कदाचित'– (हे कादबरी वाचताना क्षणोक्षणी जाणवत) 'पण समाजकारणाचा मात्र त्यानी खूपच विचार केलेला दिसतो.' हे मात्र निश्चितच जाणवत नाही) कारण तत्कालीन समाजकारण चित्रित करण म्हणजे केवळ आई, वडील, मुलगा याचे सबध, केवळ आदरयुक्त भीती, किंवा केवळ प्लेगच्या वातावरणातील चित्रण नव्हे तर मी वर वर्णन केलेले तीनही स्तर बेमालुम रीतीन गुफायला हवे होते. त्याच प्रमाण तत्कालीन भारतीय– निदान महाराष्ट्रीय समाजस्थिती त्यातील बारकावे, जाती, धर्म, पथ, अज्ञान, अधश्रद्धा याचा पगडा, साराश तत्कालीन पराभूत, पलायनवादी, मृतवत् समाजाच चित्रण अधिक वास्तव होण अगत्याच होत. त्याचप्रमाण तत्कालीन राजकीय स्थिती, साम्राज्यवादी निष्ठुरता परवशतेच्या जोखडाखाली भरडला जाणारा समाज, राजकारणातील धागेदोरे याच्या रेखीव व ठसठशीत चित्रणाच्या पार्श्वभूमीवर सावरकर कथन रेखाटता आल असत तर ते अधिक जिवत, रसरशीत आणि चैतन्ययुक्त झाल असत. या सदर्भात लेखकाला बरचस अपयश आल आहे. म्हणूनच प्रस्तावनाकार म्हणतात– 'त्याच तत्वज्ञान पूर्णत: पचवायची ताकद हवी,... दष्टचा महाभागाचे जीवन चरित्र उभे करायचे म्हणजे येऱ्या गबाळ्याचे काम नव्हे'... हे अगदी यथार्थ वाटत लेखकाची प्रशसा करतानाच प्रस्तावनाकारानी लिहिलेली ही वाक्ये त्याच्या अन्तर्यामी कुठेतरी, काहीतरी त्याना खटकलं आहे याची बोलकी जाणीव करून देतात.

### निवेदन पद्धती

सावरकर अदमानातील जीवघेणा कारावास भोगीत असतानाच आत्मकथन करताहेत अशा तऱ्हेची निवेदन पद्धती लेखकान वापरली आहे. आत्मकथन हे कादबरी प्रकाराला अनेकवेळा जरी सोयीच असल– यापूर्वी आणि यानतरही काही लेखकानी आपापल्या कादबरी लिखाणात आत्मकथना

त्मक पद्धतीचा वापर सुरेखरीतीनं केला असला तरीही या कादवरीत ही पद्धत मात्र वैगुण्य ठरावी इतकी खटकते. कारण सावरकरासारखी अलौकिक व्यक्ती स्वत कशा पद्धतीन आपल जीवन चरित्र सागेल, कथन करील याची कल्पना करून लिहिण ही सहजसोपी गोष्ट नव्हे! या बाबतीत लेखक बराच उणा पडला आहे आणि अशी निवेदन पद्धती स्वीकारून स्वत पेक्षा चरित्र नायकाला अनेकवेळा अडचणीत टाकलं आहे त्यांच्यावर अन्याय केला आहे असं वाटत कारण—

१. एकतर सावरकर आपले एखाद्या अवखळ तरुणासारखे कादबरीभर भडाभडा बोलताहेत, सागताहेत—तेही अनेकवेळा आत्मप्रौढीन तर काहीवेळा त्यांचे उद्गार निराशा, आत्मवचना यानी भारावल्यासारखे वाटतात. निराशेच्या उद्गारात काहीवेळा तर भ्याडपणा जाणवतो. स्वातत्र्यवीर असं काही व्यक्त करतील अस निश्चितच वाटत नाही.

'मी बाणेदारपणे उत्तर दिले' 'मी तेजस्वीपणे म्हणालो' 'आवेशान म्हणालो'...वगैरे वगैरे. तसच—

'शरिराची सारी इद्रियेही आता गाफील राहायला शिकली आहेत.'

'हाताच हातपणच सरल आहे उरल आहे एक कलेवर!'

'तुमच्या चिमुटभर देशात मी जन्माला आलो असतो तर...'

'पण विश्वचक्राच्या आसामध्ये हात घालायची ताकद माझ्या दोन क्षीण मनगटात नाही...' 'वेदना मिळालेल हे शरीर या अग्नीकुडात झोकून द्याव...' 'मृत्यून आपणहून कवटाळल तर हे बलीदान सार्थकी तरी ठरेल...'

—असे वानगीदाखल काही उद्गार दाखविता येतील. एक युयुत्सू व्यक्तित्त्व स्वत.-हून अस उद्गारील अशी कल्पना करून लिहिण हे धाडस तर खरच शिवाय कळत न कळत त्या व्यक्तित्त्वाला यामुळ कुठतरी कमीपणा येईल म्हणून काळजी घेण्याची जबाबदारी लेखकावर नाही का? क्षणभर आपण अस समजू की, सावरकराच्यातील कुटुबवत्सल मनुष्य आपण आपल्या कौटुबिक आठवणीत कुटुबाकरिता सुख देऊ शकलो नाही या एकमेव कारणाकरिता भावनात्मक कढ वरील उद्गारावाटे काढतील तर ते एकवेळ समर्थनीय ठरेल. पण ज्यान जाणीवपूर्वक 'सतीच वाण' घेतल आहे, जो कारावासात वैनतेयासारखी आपल्या प्रतिभेची झेप घेतो, रात्रदिवस भारताच्या स्वातत्र्याचं चिंतन करतो अशा प्रसगी असे उद्गार काढील हे संभवनीय तरी आहे का? त्याचप्रमाण आजची आधुनिक भाषा, काही शब्द सावरकराच्या तोडून वदविले आहेत या साऱ्या गोष्टी लक्षात घेतल्या तर अस म्हणावं लागत की, शब्दजजाळात या कादबरीचे प्राण तळमळताहेत. शिवाय या दोषामुळ बिचारा लेखक म्हणण्याऐवजी बिचारे सावरकर (!) अस म्हणण्याची पाळी दुर्दैवान वाचकावर येते.

### एक प्रसंग

चाफेकर फाशी जाताना लोकमान्याच दर्शन घडाव अशी अतिम इच्छा व्यक्त करतात. त्याप्रमाण त्यांना लोकमान्याच दर्शन घडतं आणि लोकमान्य त्या तिथच त्याना गीतेची प्रत देतात. हा प्रसग हृदयस्पर्शी आणि कादवरी लेखनाला उठाव आणणारा तर खराच पण तो ऐतिहासिक सत्याच्या कसावर आधारीत आहे की नाही हे तपासून पाहायला हव! 'गीता' घेऊन चाफेकर फाशी गेले हे आजवर आपण ऐकतो पण प्रत्यक्ष ही घटना घडली का?

'अदमानहून सावरकर परतले इथेच कादवरी संपली. पुढच्या आयुष्यातील विषादाचे प्रसग लेखकाने जाणूच बुजून टाळलेले दिसतात. नव्या पिढीपुढे मातृस्वातत्र्याचा एक अमर आदर्श उभा करण्याच्या मोहात लालित्यामधील गोडवा काही काही ठिकाणी कमी होऊन त्याला इतिहासाचे स्वरूप प्राप्त होते... सावरकर विलायतेला जाण्यापूर्वीचा पूर्वार्ध कादवरीत अतिशय तपशीलवारपणे माडला गेला आहे. परतु उत्तरार्ध मात्र काहीसा वार्तापटासारखा (Documentary Film) वाटतो. त्यातील दुवे साधले जायला हवे होते.'

या कादवरीतील वैगुण्यावर प्रस्तावनाकारानी नेमके बोट ठेवले आहे.

अशा अनेक उणीवा जाणवत असताना सुद्धा अगदी मनापासून आणि मनमोकळेपणान लेखकाच या कादवरी लेखनाकरिता कौतुक आणि अभिनदन करावस वाटत त्याची महत्वाची कारणे अशी—

१. आजच्या जमान्यात, हरघडी बदलत्या राजकारणाच्या अनेक समिश्र प्रवाहात, काहीशा अर्थाने उपेक्षित आणि विस्मृतीत गेलेल्या एका महापुरुषाच जीवन चित्रित करून महाराष्ट्र वाचकाला लेखकानं ज दर्शन घडविल आहे त्याबाबत विशेष कौतुक करावसं वाटतं. 'माझी शब्द समिधा' या प्रस्तावनेत लेखकान आपली सश्रद्ध आदराजली वाहिली आहे. ती निष्ठा, तो आदर, ती भावना मात्र बावन्नकशी आहे! विशुद्ध आहे!

२. स्वातत्र्यवीराना जी अनेक अमर काव्ये स्फुरली त्यामागच्या त्याच्या मनातील प्रेरणा, अनत उर्मी कशा निर्माण झाल्या त्याचे अतिशय मनोज्ञ, काव्यमय चित्रण लेखकाने केले आहे.

३. मातृप्रेम, मातृभूमीप्रेम, आईचा मृत्यू, प्लेगच्या साथीतील भयावह स्थिती, चाफेकराच्या हौतात्म्यानतर चरित्र नायकाची मन स्थिती, त्यानतरच्या आजारपणातील दिव्य स्वप्न, लोकमान्यदर्शन, येसूवहिनी, बाबा, वडील याच्याबद्दलचा पूज्यभाव, मातृभूमीच्या मुक्तीकरिता घेतलली शपथ, विदेशी कपड्याची होळी, आर्यभूचे वर्णन, इग्लडला जाताना भारतभूमीचा घेतलेला निरोप, इग्लडमधील १८५७ च्या राष्ट्रीय उत्थानाचा ५० वा वर्षदिन, अनेक प्रसगी केलेल देवतेच स्मरण, पुत्राचे निधन, अदमानातील प्रसग... अशा कितीतरी प्रसगी, लेखकाची लेखणी भारावते, फुलते, त्या लेखणीला काव्यमयतेचे, सुरेख शब्दाचे, वर्णनाचे अनत धुमारे फुटतात. भाषेचा डौल, सुबकता, सौदर्य याचबरोबर लेखकाची सहृदयता वाचकाला निश्चितच जाणवते. विलोभनीय भाषाशैली हा विशेष गुण वरील प्रसगाचे चित्रण करताना जाणवतो.

स्वत लेखकाने आणि प्रस्तावनाकारानी लिहिल्याप्रमाणे 'सध्याच्या अस्तित्त्ववादी लिखाणाच्या काळात समाजऋणाची जाणीव ठेवून 'सागरा, प्राण तळमळला' ही कादबरी लिहून समाजाचे अशत: तरी ऋण फेडले आहे' या त्यांच्या भूमिकेची वाचक दखल घेतील आणि कादबरीचे वाचन करतील याची खात्री वाटते.

विशेषत आजच्या तरुण पिढीसमोर एक उत्तुग जीवनचरित्र ठेवल्याबद्दल लेखक अभिनदनास पात्र आहे. ◻

**सागरा प्राण तळमळला**
लेखक : रवीन्द्र भट
सजय प्रकाशन पुणे ४.
किंमत २०–०० रु.

# मराठी रंगभूमीवरील शिलेदार 'शिलेदार'

नरुभाऊ लिमये

मराठी मातीचा असा गुण आहे की जेव्हा एखाद्या क्षेत्रात मरगळ येते, सकटे येतात तेव्हा उत्स्फूर्त शिलेदारी करून त्या प्रसंगातून ती कला बाहेर काढणारी मडळीही मिळतात. महाराष्ट्राचे अभिमानी लेणे म्हणून मराठी रगभूमीचा उल्लेख करण्यात येतो. विशी-तिशीच्या त्या दशकात गधर्व, ललितकला, बलवत, यशवत, महाराष्ट्र, अनेक समर्थ नाटच सस्थानी मराठी रगभूमी समृद्ध केली. कुणी किर्लोस्कराचा वारसा सागितला तर कुणी इग्रजी हॅम्लेट अमर करणाऱ्या गणपतराव जोशीची परपरा मानली. मराठी मनाला रिझवणाऱ्या-जुमानणाऱ्या त्या नाटचरगभूमीचा तो अत्यत समृद्धीचा काळ होता. रोज रात्री शीतलचद्राच्या प्रकाशाला साथ देणाऱ्या तेजस्वी ताऱ्याची मालिकाच पहात एखाद्या नाटचगृहात जावें. *आपल्या आवडत्या* नटाला दाद द्यावी, तृप्त व्हावे 'असा तो काळ होता.

पण कोठल्याच क्षेत्रातील भरभराट सतत टिकत नाही. भरती, ओहटी शुक्ल–कृष्ण पक्ष होतच असतो. म्हणून कुणी निराश होत नाही. *मावळत्या सूर्याचा गुलाबी निरोप* असतो की उद्या येणार आहे. मध्यतरी हताश होऊ नको, निराश होऊ नको. तो आशेचा सदेश त्या कलाक्षेत्रातले शिलेदार सर्वांना सागत सुटतात. त्यासाठी कष्ट घेतात, श्रमतात आणि पुन्हा पूर्वेच्या दिशा उजळल्या की अधारात केलेल्या धपपडीचे चीज झाले असे त्याना वाटते.

### शिलेदार रौप्य महोत्सव

हा विचार मनात आला तो शिलेदार मडळीच्या मराठी रगभूमी या नाटच सस्थेला यदाच्या दसऱ्याला पचवीस वर्षे पूर्ण झाली अशी वार्ता कळली तेव्हा. वाटले, श्री. जयराम शिलेदार आणि सौ. जयमालाबाई याना आज समाधान वाटत असेल. जयराम–जयमाला जोडी मराठी रगभूमीच्या पडत्या काळात रगभूमीवर आली. नटसम्राट बालगधर्वाच्या समवेत जयरामनानांना काम करण्याची सधी मिळाली, पण तो दिवा मंदावत होता. स्वत: बालगधर्व आणि त्याचे बरोबरच ती *अलौकिक प्रतिभा मदावत* होती. जयमालाबाईंनीही त्या रगभूमीवर आपल्या गुणाची साथ दिली, पण मदिर चिराळत होते. टिकणार की नाही शका होती. एकापेक्षा एक खदे नट आपापल्या नाटचसस्था सोडून–मोडून 'भटके' जीवन जगत होते. जणू एका वरिष्ठ कला साम्राजाचा तो अतकाळ होता ! वर उल्लेखिलेल्या नाटचसस्था आणि त्याच्या रगभूमीवर नवी सृष्टी निर्माण करणारे नट जणू आज्ञातवासात गेले होते. त्याना जावेच लागले होते

अशा अवघड अधाऱ्या परिस्थितीत नव्या जिद्दीने शिलेदार मडळी नाटच ससार स्थापण्यास सिद्ध झाली. सारी कला प्रचड प्रवाहात वाहून जाते हे दिसत असताना प्रवाहाविरुद्ध दोन हात करीत ते जुने कलासुख जतन करण्याचा तो प्रयत्न होता. भाडवल होते स्वत:च्या कला सामर्थ्याचे आणि मराठी रगभूमी जिवत ठेवली पाहिजे या दुर्दम्य महत्त्वाकाक्षेचे. ज्या बालगधर्वांनी जाता जाता ही क्षीण ज्योत आपल्या हातात दिली ती आपण जतन केली पाहिजे. जयराम म्हणतात, 'नटसम्राटाबरोबर नायकाच्या भूमिका करण्याचे भाग्य लाभले. कृष्ण, धैर्यधर, दुर्योधनाच्या माझ्या भूमिका नटसम्राटाना (बालगधर्वांना) सतोष देणाऱ्या ठरल्या. माझ्या नाटकी आयुष्यातला माझा सर्वात मोठा आनद तो होता. बालगधर्वांनी मला छान म्हटले !'

### नाटच जीवनाची अवस्था

सगीत नाटचसृष्टीचा हा वारसा होता. ती सगीत रगभूमी समृद्ध करण्यासाठी गायक नटाबरोबरच भास्करबुवा, वझेबुवा, मास्टर कृष्णराव, गोविंदराव टेंबे अशा मडळींनी आपल्या श्रमाची उधळण केली होती. शिलेदार जोडप्याला त्याचा लाभ मिळाला होता. जणू गुरुऋण फेडण्यासाठी तरी ती सगीत रगभूमीची ज्योत जतन करण्याचे कर्तव्य त्याना करावयाचे होते. कुणा बाहेरच्याचा आग्रह नव्हता. तर त्याच्या अतरीचा तो हुकार होता. बाहेरची मडळी हलक्या फुलक्या नाटकावर 'नाईट' घेऊन गुजराण करीत होती. प्रेक्षकही ऐन कोजागरीच्या पौर्णिमेला आटीव दूध मिळेल म्हणून येत आणि ताकाचे पाढरे पाणी पिऊन जात तरीही मराठी रसिकाने रगभूमीवरचे प्रेम सोडले नाही. छद कमी झाला नाही जयराम सागत होते की सर्वत्र गद्य-आधुनिक नाटकाचे संसार उभारले जात होते. सगीत *नाटक यापुढे चालणारच नाही का अशी* शका येत होती. पण त्याच वेळेला बालगधर्वांच्या ध्वनिमुद्रिका तन्मयतेने ऐकणारे असख्य श्रोते दिसत होते. कुमार गधर्वांसारखे गायक 'मला उमजलेले बालगधर्व' रसिकासमोर मांडण्यास तयार होते आणि त्यासाठी गधर्व सगीताचा छद घेऊन वाढत होते. तेव्हा शिलेदार मडळींना विश्वास वाटला की समाजात भडक फॅशन रोज बदलते तसेच या नवनाटचाचे होईल. हलके फुलके उडून जाईल. पुन्हा ती सौभद्रासारखी नाटके पहाण्याची सुप्त भूक जागी होईल. नाटच सगीतात कितीही बदल झाला तरी 'बालगधर्व आणि दीनानाथ यांच्या गान परपरेच्या त्या समातर रेषा, स्त्री नाटच गायनातील नाजूक लाडकी गधर्व पद्धती आणि नायकाच्या गाण्याचा आवेश आणि जोष दीनानाथाच्या दोन्ही लकबी ऐकण्यासाठी मराठी रसिक उत्सुक असेल. फक्त ज्या निष्ठेने व ताकतीने मागील पिढीच्या नटमडळींनी सगीत नाटक सादर केले तसे केले पाहिजे !'

जुनी सगीत रगभूमी पुन्हा रसिकाना सादर करावयाची याच ध्येयाने पण चालू जमान्यात संस्था चालू ठेवली पाहिजे या व्यवहारी नजरेने १ ऑक्टोबर १९५९ रोजी स्थापन झालेली शिलेदाराची 'मराठी रगभूमी' ही नाट्यसस्था वाटचाल करीत होती. लोकाना पचेल आवडेल पण त्याची चव (टेस्ट) बिघडणारही नाही अशी नाटके रगभूमीवर आणीत होते. बाळ कोल्हटकर यांची मुबईची माणसे, एखाद्याचे नशीव, मला निवडून द्या सारखी नाटके रंगभूमीवर येत होती. तसेच ते नाटकार नट म्हणूनही मराठी रगभूमीवर येत होते. नानासाहेब गोखले यांची कवी अनतफदी, सैरध्री ही नाटके आणि सध्या रसिकानी मान्य केलेले विद्याधर गोखले याचे स्वरस राज्ञी– पचवीस वर्षात सत्रा नवी नाटके या सस्थेने रगभूमीवर आणली.

पण खरे: यश खरा आनद होता तो मराठी रगभूमीने जुनी गाजलेली नाटके पुन्हा रसिकासमोर सादर केली सौभद्र, स्वयवर, मूक नायक, शारदा, मानापमान, भाववधन, सशयकल्लोळ, मृच्छकटिक ही नाटके म्हणजे मराठी रगभूमीच्या गळ्यातला नवरत्नांचा हार. तो गळ्यात घालून मिरविण्यासही काही सामर्थ्य लागते. तो हार शोभून दिसेल असे सौंदर्य लागते ती बाजू सौ. जयमालाबाईंनी अत्यत समर्थपणे साभाळली. कै. सेनापती बापट यानी स्वदस्तुरचे पत्र लिहिले. जयमालाबाईंच्या स्वत:च्या नाट्यजीवनाची पचवीस वर्षे पूर्ण झाली त्या प्रसगी सेनापतीनी लिहिले, 'पंचवीस वर्षे निष्ठेने मराठी रंगभूमीची सेवा केलीत व गधर्व– किर्लोस्कर नाट्य परपरा जतन केलीत याबद्दल मनापासून सतोष होत आहे. त्याची गान–नाट्यसेवा जनता जनार्दनाच्या चरणी रुजू झाली आहे. सरकारने त्यांच्या कलेचे उचित कौतुक करणे जरूर आहे असे मला वाटते.'

सेनापतीचे हे सतोष सर्टिफिकेट जयमालाबाईंनी मिळविले. अनेक मान्यवर रसिकाचे कौतुक त्यांना लाभले. त्याच्या भामिनी, सुभद्रा, रेवती, वसतसेनेच्या भूमिका जुन्याना गधर्वांची आठवण करून देत तर नव्या पिढीला कला कशी वावरते, आकार घेते याची साक्ष पटवीत होत्या. सारी जुनी नाट्यरगभूमीची परपरा चालू ठेवण्याचे श्रेय जयराम–जयमाला यानी मिळवले. सुदैवाने त्याच काळात मराठी रगमंचावर छोटा गधर्व, राम मराठे, रामदास कामत असे सगीत नटही लाभले. पुन्हा एकदा सगीत रगभूमी बहराला आली मागच्या पिढीने 'किर्लोस्करी' दर्जा आला नाही असे जरी म्हटले तरी परपरा टिकविली एवढा दाखला खासच दिला.

## ज्योत तिसऱ्या पिढीच्या हाती

जयराम–जयमाला जोडीचे कर्तव्य तेथेच सपले नाही. काहीतरी आणखी केले पाहिजे ही त्याना बोच होती. नटसम्राटाची तुटू पहाणारी परपरा आपण चालू ठेवली, यश मिळवले पुन्हा एकदा जुनी नाट्यसृष्टी वसतऋतूची पालवी आल्यासारखी प्रसन्न दिसू लागली. तरीही आपण दोघेही केव्हा तरी 'जुने' होणारच जयमालाबाईची सेवा साधना पचवीस वर्षांची झाली किती दिवस त्या सुभद्रा होणार ! लोक का मानतील !

एक दिवस त्याच्या घरातच त्याना दोन हिरकण्या सापडल्या. आपली लता–कीर्ती गाऊ लागली. चागल्या गातात या आनदाचा अकुर नव्या आशा वाढवून गेला. शिलेदार मडळीनी आपल्या घरच्याच तीन मुलाकडून 'सौभद्र' नाटक बसवून घेतले. लता बारा वर्षाची, कीर्ती दहा आणि सुरेश आठ. नाटक सौभद्र. अवीट गोडीचे. मराठी रगभूमी नाट्यसस्थेचे ते मोठेच धाडस होते. कल्पना नवी. कौतुकाची पण या छोट्या शिलेदाराची दौड मोठी तीन पात्री सौभद्र मराठी रसिकानी, वृत्तपत्रानी अक्षरश: डोक्यावर घेतले. रसिकराज, कादबरीकार अप्पासाहेब फडके म्हणतात, 'जयराम–जयमाला दापत्याचे अभिनदन ! त्रिपात्री प्रयोगात प्रेक्षकाचा पळभरदेखील वेळ फुकट जात नाही. नेपथ्य, वेषभूषा प्रेक्षकाना प्रसन्न करणाऱ्या आहेत अत्यत शुद्ध वाणी, सुयोग्य अभिनय खास तुमच्या (जयमाला) प्रासादिक मधुर गायकीने म्हटलेली पदे अशा अनेक गुणानी हे छोटे शिलेदार श्रोत्याना तृप्त करतात. या तीन दृष्ट लागण्याजोग्या गुणी बालकाना तयार करून कलाकाराची नवी पिढी मराठी रगमचावर उभी केली आहे'

ह्या त्रिपात्री सौभद्राला आता दहा वर्षे होऊन गेली. आज मराठी रगभूमी सस्थेतर्फे कु कीर्तीला गधर्वाच्या परपरेतील नवी आशा म्हणून लोकांनी मान्यता दिली आहे. आपल्या आईच्या सर्व भूमिका ती एवढ्या समर्थपणे रगविते की मराठी सगीत रगभूमी अमर आहे याची साक्ष पटते. स्वयंवरात राणीचे काम करताना जयमालाबाई रुक्मिणी झालेल्या कीर्तीला म्हणतात, 'माझी बाळ शहाणी आहे हो, शहाणी आहे.' ऐकणाराला नाटकातली राणी रुक्मिणीला बोलते आहे की जयमालाबाई आपल्या गुणी कन्येचे कौतुक करीत आहेत असा गोड सभ्रम पडतो. प्रौढ प्रेक्षकात वात्सल्ययुक्त आनदाची लहर लहरून जाते. बालगधर्वांच्या चालीची कीर्ती तर दिनानाथाची आठवण करून देते लता. तिने धैर्यधर उभा केला. लोकानाही आवडला पण दिनानाथाच्या दोन अविस्मरणीय भूमिका तेजस्विनी आणि लतिका या जेव्हा कु. लतेने मराठी रसिकाना सादर केल्या तेव्हा खरी दाद मिळाली ती खटघाळ वल्लरी, ती सौभद्रात रुक्मिणी, सशयकल्लोळात कृत्तिका, स्वरसम्राज्ञीमधील अशीच आधुनिक गायिका आपला ठसा उमटवून जातात. असा आहे शिलेदाराचा नाट्यससार. नाट्य समीक्षक रा. शं. वाळिंबे म्हणतात, 'सगीत व नाट्य या दोन कलाचा उत्कृष्ट वारसा या कुटुबाला मिळालेला आहे. एकाच कुटुबातील चार व्यक्ती अभिनय व सगीत कलेत प्राविण्य सपादन करून रगभूमीचे भाग्य समृद्ध करीत आहेत. असे दुसरे उदाहरण शोधूनही सापडणार नाही.'

खरेच आहे. जयरामना वाटते, आजच पुन्हा नायकाचे कामासाठी गायकाची चणचण भासते. एकच नट सकाळ, दुपार, सध्याकाळ काम करतो. जरा कुणी बरा गाणे म्हणू लागला की त्याला पिटातल्या टाळ्याची गोडी लागू लागते आणि तो आपले घडत असलेले गाणे गमावून बसतो. पूर्वी तालीम मास्तर ही जबरदस्त शक्ती असे आज अधिकाराने कुणाला सागावे आणि कुणी ऐकावे असा जमानाच राहिला नाही ! खोट्या प्रशसेची सोबत मिळाल्याने काही विचार-विवेक याची गरजच वाटत नाही ! शिलेदारांची ही व्यथा खरीही असेल नव्हे आहेच. पण त्याने मराठी रगभूमी आता रेंगाळणार नाही जयराम–जयमाला जोडीने पूर्वीच्या पिढीचा वसा घेतला–घेतला वसा टाकू नको, मातू नको–हा आपल्या कहाण्यामधून सागितलेला उपदेश मानला. आपली साधना पूर्ण केली. ती ज्योत कीर्ती, लताच्या रूपाने तेवत ठेवली अधिक चमकदार केली. मराठी रगभूमी संस्थेचे पाव शतक सार्थकी लागले असेच वाटले. ☐



# आविष्काराचा नवा जन्म

# Improvisation

## पुष्पा भावे

छबिलदास शाळेचे सभागृह प्राप्त झाल्यापासून 'आविष्कार' या संस्थेचे कार्यक्रम वेगाने चालू झाले आहेत. विशेषत: या कार्यक्रमांना वैविध्य प्राप्त झाले आहे. 'प्रतिमा' या काव्यनाटकाचे प्रयोग, यशवंत देवांचा 'गीत असे जन्मा येते' हा कार्यक्रम, आरती हवालदारांचे नाटचवाचन असे अनेक कार्यक्रम या संस्थेने गेल्या चार पाच महिन्यात सादर केले. याशिवाय 'उन्मेष' 'बहुरुपी', 'अभिव्यक्ती' याही प्रायोगिक संस्थांना आपल्या प्रयोगासाठी या सभागृहाचा वापर करता आला. गेल्या रविवारी याच सभागृहात Improvisation चा एक कार्यक्रम झाला. ही स्पर्धा नव्हती हे विशेष आहे. केवळ नाटचप्रक्रियेविषयीच्या कुतुहलातून निर्माण झालेला हा कार्यक्रम चारच संस्थांना आकर्षित करू शकला. हीच स्पर्धा असती तर–असो. पण प्रायोगिक नाटचसंस्थांनी आपली प्रायोगिक रंगमंच चळवळीविषयीची कल्पना एकदा तपासून पहायला हवी. गेल्याच महिन्यात पार्ले येथील 'गॉसिप ग्रुप'ने Improvisation ची स्पर्धा घेतली होती. पण मी त्यावेळी उपस्थित नसल्यामुळे काही लिहू शकत नाही.

'आविष्कार'ने हा कार्यक्रम योजला त्याचवेळी अहमदाबाद येथे नाटककारांसाठी workshop चालवणारे मधु राय मुंबईत आले होते. त्यांनी या कार्यक्रमांसाठी सर्वांना विषय दिला–काळ आजचा : एका उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्याचे घर : ऑथेल्लोच्या रुमालाऐवजी गांधी टोपी वापरा. 'आविष्कार' या संस्थेने प्रारंभ केला. जयदेव हट्टंगडी यांनी दिलेल्या तालावर प्रेक्षागृहात विखरून बसलेली 'आविष्कार'ची कलावंत मंडळी विशिष्ट विरचना करीत फिरू लागली. शैलीदार पद्धतीने सादर केलेल्या या प्रयोगात अखेर एक कथा निवेदनच होते. स्मगलिंगला मदत करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याचे! 'बहुरुपी' या संस्थेने विनोदी शैलीत हा विषय सादर करायचे ठरविले. पण त्यांना कोणत्याच विशिष्ट दिशेने जाता आले नाही. याउलट 'गॉसिप ग्रुप'च्या प्रयोगात फार काटेकोर निश्चित दिशा होती. Impovisation म्हणून त्या प्रयोगाकडे पहाता त्यात अनेक दोष होते. पण त्या संध्याकाळातला तो सर्वांत चांगला प्रयोग होता. तीन स्त्रीकलावंतांच्या सहाय्याने न्यायदेवता–तिच्या हातातील तराजू उभा केला होता– तर पुढे वृंदाचे काम करणारे तीन पुरुष गांधीजींनी प्रसिद्ध केलेल्या तीन माकडांच्या रूपात बसविले होते. एका पुराच्या कमिशन चौकशीचे सूत्र घेऊन गांधी टाकलेले पारडे जड होते असा शेवट केला होता. 'अनिकेत' या संस्थेने प्रत्यक्ष गांधी टोपीचा वापर न करता एका कामगार पुढाऱ्याच्या कथानकाच्या आधारे ('मुंबई दिनांक'वरून) सत्तेचे वजन व्यक्त केले. परंतु सेक्रेटरीची भूमिका करणारे पात्र शब्दात इतके अडकले की त्यामुळे रंगमंचावरील दोन बाजूला दिसणाऱ्या दृश्यात काही संबंध निर्माणच होऊ शकला नाही. किंबहुना एरवी लिखित नाटचसंहितेचे दिग्दर्शन करताना उत्क्रांतनाटच वापरणाऱ्या पालेकरांची कल्पकता या कार्यक्रमात अभावानेच जाणवली.

हा कार्यक्रम पहात असताना एक प्रमुख दोष जाणवला तो असा की, चोवीस तास ही कालमर्यादा इतकी मोठी होती की तालीम करून प्रयोग सादर करण्यात आले. त्यात उत्स्फूर्ततेचा अभाव होता. हातात कागद घेऊन वाचणे तर सरळ सरळ हास्यास्पदच होते. दोष केवळ कलावंतांचा नसून माझ्या कल्पनेप्रमाणे विषयसूत्राचा होता. दिलेला विषय नाटककारांना देण्याजोगा होता. नट व दिग्दर्शक यांनी Improvisation कशासाठी करायचे ?

१. लिखितसंहितेतील दोन ओळींमधील अर्थ वाचण्याचा सराव म्हणून.

२. कल्पनाशक्ती तीव्र व्हावी म्हणून–

३. दिग्दर्शकाचे बोट सोडून स्वत: स्वतंत्रपणे भूमिका उभी करायची पूर्वतयारी म्हणून–

४. नटाची अंत:प्रेरणा सदा ताजी रहावी म्हणून–

५. अनेकदा दोन प्रवेशांमध्ये वा दोन अंकांमध्ये घडून जाणाऱ्या, परंतु रंगमंचावर न येणाऱ्या घटनांचे संस्कार अभिनयावर करता यावेत म्हणून–

६. नाटक चालू असताना प्रत्येक क्षण रंगमंचावरील वास्तवात रहाता यावे म्हणून–

यासाठी करावयाची वेगवेगळी उत्क्रांत वा उत्स्फूर्त नाटचे करता येतील. 'आविष्कार'च्या अशा पुढील कार्यक्रमात अधिक प्रतिसाद मिळेल व नंतरची चर्चा अधिक सुसूत्र होईल ही आशा ! □

पी. डी. ए. :

# काळगंगेच्याकाठी

## वि. भा. देशपांडे

पुण्यातील पी. डी. ए. संस्थेने चित्रकार द. ग. गोडसे यांचे 'काळगंगेच्याकाठी' हे नाटक सादर केले. 'राजियाचा पुत्र अपराधी देखा' हे मूळ नाटक. त्याचेच नाव बदलून 'काळगंगेच्या काठी' सादर झाले. हे नाटक पूर्वी मुंबईत पहिल्या नावाने प्रयोगित झालेले आहे.

संभाजी राजांच्या जीवनात ज्या अनेक प्रकरणांचा उल्लेख येतो त्यामध्ये गोदावरी प्रकरण हे एक आहे. राजांनी तिला पळवून किल्ल्यावर ठेवली. कोणत्याही प्रकारे तिच्या शीलाचा भंग नाही. गोदावरीने त्या परिस्थितीत माहेर-सासर दोन्हीकडे जाण्याचे

नाकारून सतीत्त्व पत्करले. सभाजी राजांनी आपल्या चितेला अग्नी द्यावा असा आग्रह धरला. सपूर्ण नाटकात महत्त्वाची केंद्रभूत अशी घटना एवढीच 'नाटकात या घटनेचा ताण अनावश्यक ताणला आहे. या एकाच घटनेचा आतरिक परिणाम जिजाबाई, शिवाजी, गोदावरी आणि इतरावर कसा झाला हे नाटककाराला अभिप्रेत दिसते. पण नाटककाराचा प्रयत्न शब्दातच गुतून पहिल्या स्तरावरच राहिला. सघन आशय त्यामध्ये व्यक्त होऊ शकला नाही. राजघराण्यातली ही सारी माणसे या एका घटनेने कोसळण्याची वेळ आली हे व्यक्तिरेखाच्या मनोवगाहनातून व्यक्त झाले,' नाही. नाटक निवेदनात्मक, वर्णनात्मक, चर्चात्मक पातळीवरच राहिल्याने परिणामाच्या दृष्टीने उणे झाले. या नाटकाची भाषा जुन्या ऐतिहासिक नाटकाच्या थाटाची ठोसदार अशी नाही. तसेच शेवटच्या प्रवेशाचा अपवाद वगळल्यास या भाषेला काव्यात्मकतेचाही स्पर्श नाही. त्यामुळे त्या भाषेचे श्राव्यमूल्यही मर्यादित आहे.

या नाटकाच्या भाषेचे मर्यादितपण मान्य करूनही हे नाटक श्रवणाचे–वाचनाचे–आहे, प्रयोगाचे नाही, हे सतत जाणवत होते. त्यातूनही अशा नाटकाना प्रयोगरूप द्यायचेच असेल तर फार मोठे आव्हान असते. ते पी. डी. ए. ला पेलले नाही. ज्यावेळी शब्दप्रधान–सवादप्रधान नाटक सादर होते तेव्हा (खरे म्हणजे इतर वेळीही) ते सवाद तितक्या ताकदीने, वजन घेऊन प्रेक्षकापर्यंत पोहचावयास पाहिजेत. तसे घडले नाही. श्रीराम खरे (शिवाजी), सेवा चौहान (धाराई), वसत देशपाडे (मोरोपंत) हे तीन अपवाद सोडले तर उरलेल्या मडळीना रंगभूमीवर सवादफेक कशी करावी याचे तंत्र अवगत नव्हते. नाटकातील शब्दाशय ध्यानात घेऊन त्या वजनाने शब्दफेक करणे त्याना जमत नव्हते. सर्वात मोठी निराशा केली ती ताराबाई घारपुरे (जिजाबाई), विद्याधर ससारे (सभाजी) शोभा पत्की (गोदावरी) या कलाकारानी. ताराबाई घारपुरे सस्थेतील जुन्यापैकी एक आहेत. पी डी. ए. च्या अनेक नाटकातून त्यानी भूमिका केल्या आहेत. त्याचे 'सध्याचे वय जिजाबाईशी जुळत मिळते आहे म्हणून तर त्याना ती भूमिका दिली नाही ना ? असे सारखे वाटत होते, त्याबद्दल अधिक काही न लिहिणे बरे ! शोभा पत्की आणि ससारे हे दोघेही गोदावरी सभाजी म्हणून दिसले योग्य पण पाठातर केलेले सवाद म्हणण्या पलीकडे त्यानी काहीच केले नाही (एकदा–दोनदा तेही नीट केले नाही) या नाटकातील साऱ्याच कलाकाराची अभिनयरीती ढोबळ होती, भडक होती प्रेक्षकाकडेच पाहून बोलले पाहिजे असा जणू काही निश्चय सर्वांनी केला होता कलाकाराचा कोरा चेहरा आणि त्याच्या तोडून येणारा निर्जीव शब्द प्रेक्षकाशी कोणताच सवाद साधू शकत नसतात. या नाटकात थोड्याफार फरकाने तेच घडले. उल्लेखनीय दोन गोष्टी होत्या. एक म्हणजे मधुकर गोळवलकरानी दिलेले पार्श्वसगीत. प्रसगातील भावनेला अनुकूल पण शब्द श्रवणाला त्रासदायक न ठरणारे असे सगीत होते. दुसरी गोष्ट म्हणजे आटोशीर नेपथ्य. महालाचा मधला भाग काढून टाकून त्यातूनच गडकिल्ला कटाऊटने दाखवला होता. त्याला आवश्यक ती प्रकाशयोजनाही ठीक होती. दिग्दर्शक होते. प्रा. भालबा केळकर. प्रयोग पाहिला आणि निराशा झाली. ही निराशा केवळ एखादा प्रयोग फसल्याची नव्हती. तसे अनेक फसलेले प्रयोग पहाण्याचा योग येतो. पण ज्या प्रयोगाची निर्मितीमूल्ये गुणवत्तेच्या दृष्टीने वरच्या श्रेणीतील असतात त्या फसलेल्या प्रयोगानी निराशा येत नाही त्याची वाईट वाटण्याची कारणे वेगळी असतात. पण पी. डी. ए. चा प्रयोग पाहून असे वाटले की प्रयोगामागचा कलात्मक विचार, परिश्रमाची मर्यादा, कलाकारांच्या अभिनयाची सीमितता, दिग्दर्शनातील ढोबळपण विषाद निर्माण करणारे होते. आज रगभूमीवर विविध प्रकारची नाटके होतात. त्यातली किमान प्रयोगसफाईसुद्धा पी. डी ए च्या प्रयोगात नसावी ? वादग्रस्त ,घाशीराम' नतर सस्था दुभगली. उरलेल्या मडळीनी गेल्या दोन वर्षात काही नाटके सादर केली. पण ती नाटके पाहून सस्थेची कलात्मक जीर्णता जास्त जास्तच स्पष्ट होत गेली असे प्रयोग सस्थेचे नाव–कीर्ती टिकवण्याचा प्रयत्न वाझोटा आहे. याही प्रयत्नात सस्थेच्या मडळीना जर समाधान असेल तर ठीकच आहे.

खरे तर या प्रयोगावर इतके विस्ताराने लिहिण्याजोगे काय आहे किंवा एकूणच पी. डी. ए. च्या नाट्यकार्याविषयी लिहिण्याबोलण्यासारखे काय आहे ? असा प्रश्न नाट्यवर्तुळात आता विचारला जातो. पण ज्या सस्थेने डॉ. श्रीराम लागू, वासुदेव


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्ग)

पंचावन रुपये

गाळंदे, जयत धर्माधिकारी, जब्बार पटेल इत्यादीसारखे नट-दिग्दर्शक दिले, ज्या प्रा. भालबा केळकरानी काही चागली प्रॉडक्शन्स दिली, हौशी रगभूमीच्या सदर्भात संस्थात्मक पातळीवर निश्चित स्वरूपाचे मौलिक कार्य केले, अशा सस्थेच्या ढासळत्या भिंती सावरण्याचा प्रयत्न अधून मधून असे निष्प्रभ प्रयोग करून होणार असेल तर ती चिंतेची बाब आहे !

त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या प्रेक्षकावर भालबाचा पूर्ण विश्वास आहे तोही प्रेक्षक अस्वस्थ आहे. '*काळगंगेच्या-काठी*'च्या प्रयोगाला दुसऱ्या अकात एक प्रेक्षक आपली वाईट प्रतिक्रिया जाहीरपणाने व्यक्त करीत गेला. माझ्या माहितीप्रमाणे तो प्रत्यक्ष भालबांनाही भेटला. तो जे मोठमोठ्याने बोलला ते तिथल्या सर्वच प्रेक्षकांच्या मनात होते. इतरेजनांनी सभ्यता-सौजन्य दाखवले. त्या प्रेक्षकाचा सयम सुटला. त्या प्रेक्षकाचे म्हणणे होते-' जमत नाहीतर नाटक करता कशाला—बालगंधर्वांत जाहीर प्रयोग लावता कशाला ?'—मला वाटते त्याचे हे म्हणणे प्रातिनिधीक होते. सस्थेतल्या सर्वांना अतर्मुख करायला लावणारे. नुसताच विचार नाही तर त्यावर निर्णयाप्रत यायला लावणारे ! ☐

## कलोपासक : ऑक्टोबर

कलोपासकानी ऑक्टोबरमध्ये प्रा. रमेश कोटस्थाने लिखित '*स्नेहांकित सजय*' ही एकांकिका सादर केली. एका सज्जन, सत्प्रवृत्त, स्वप्नाळू तरुणाला नोकरीच्या सदर्भात येणाऱ्या अनुभवावर, त्याच्या अपेक्षा आणि अपेक्षाभगावर, अवतीभोवतीच्या वातावरणावर आधारलेली ही एकांकिका. लेखनदृष्ट्या अत्यत सामान्य असलेली, शब्दाच्या मोहात अडकलेली ही एकांकिका आहे. एखादा प्रसग निर्माण करून त्यातले ताण नाट्यपूर्णरीतीने व्यक्तवण्याचे सामर्थ्य एकांकिकेत नाही. त्यामुळे एकांकिकेत एकामागून एकेक काहीबाही घडत जाते, त्यावर पात्रे आपली उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करीत असतात, एवढेच !

या एकांकिकेचे दिग्दर्शक होते अजित अभ्यकर. नव्या दमाचा, चार-दोन भूमिकाचा थोडाफार अनुभव असलेला हा कलाकार. त्याचा पहिला प्रयत्न म्हणून ठीक एकांकिका दिग्दर्शनात आणि त्याच्या भूमिका प्रदर्शनात एक ताजेपण होते, प्रयत्नशील वृत्ती होती. तेवढीच आशादायक गोष्ट. बाकी एकांकिकेत खास काही नाही.

एकांकिकेतील इतर सारे कलावत महाविद्यालयीन स्तरावरचे होते. उत्साही होते. त्यांचा उपयोग यापेक्षा अधिक चागल्या एकांकिकेसाठी व्हायला हवा. '*प्रयोग*'च्या मूळ कल्पनेशी समतोल राखण्याचा प्रयत्न अशा एकांकिकेने फसतो. फक्त महिन्याच्या महिन्याला '*साजरे*' करणे उरते ! तसे होत असेल तर चांगले नाही. गतवर्षीही ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या एकांकिकाचा दर्जा सर्वार्थाने सामान्य होता.. सस्थेतील इतर मातबर मडळी राज्य स्पर्धेच्या प्रयोगात गुतल्याने कोणाला तरी सांगून नव्याला सधी देण्याचे श्रेय घेतले जात असेल तर ते परिणामी घातक आहे. त्या सदर्भात मागे मी म्हटले होते की जर एखाद्या महिन्याला चांगली एकांकिका, दिग्दर्शक मिळाला नाही-तर तो महिना भाकड जाऊ' द्या. त्याबद्दल कोणीही जाब विचारणार नाही. पण केवळ काही सादर करायलाच हवे असे नाही. आशय, विषय, तत्र, अभिनय, दिग्दर्शन यापैकी कोणत्या ना कोणत्या गोष्टीचे आव्हान हवे. तरच '*प्रयोग*' या उपक्रमाला अर्थघनता येईल. पुढचा प्रयोग पहाण्याची उत्सुकता राहील ! ☐


सतरा अठरा वर्षे बहार पेश करून वहिदा आपल्यासारख्या चहात्यापासून दूर गेली आहे. वहिदा एक मनस्वी छोकरी ! साप पकडण्यासारखी तिची जगावेगळी आदत होती. '*आज जिने की तमन्ना है—आज मरनेका इरादा है*' हा जणू वहिदाच्या मनस्वी स्त्रीत्त्वाचा खास विशेष होता. एरवी बॅलन्स्ड दृष्टीची ही नाईस आणि समजुतदार हिरॉइन तनुजा स्टाईलने आपल्या दुनियाकी रस्मे छोडके, एक नवा अनुभव मिळवण्यासाठी लहान मुलीच्या निरागसपणे आसुसलेली असायची. '*भेलपुरी*' खाऊन आपले पोट बिघडते आणि त्या निमित्ताने आपल्या आयुष्यात एक अॅक्टिव्हिटी निर्माण होते म्हणूनच कोपऱ्यावर जाऊन भेलपुरी खायची.

**—अशी ही वहिदा**

भाऊ पाध्येंच्या शब्दात

**माणूस**
**दिवाळी अंक**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

दि. २६-१०-७४ ते १-११-७४

### महाराष्ट्राचे नवे नेतृत्व : श्री. रामराव आदिक.

धनू राशीखाली असलेला महाराष्ट्र सध्या राजकीय रंगमंचावर गाजत आहे. महाराष्ट्राच्या नेतृत्व बदलण्याच्या वातम्या व त्यांचा इन्कार हा पाठशिवणीचा खेळ चालू असला तरी अंतरिक्षातील ग्रह 'पडद्याआड' खलबते करीत आहेत. त्याचे दृश्यफल याच आठवड्यात दिसू लागेल मकर रास व तूळ लग्न असलेले श्री. रामराव आदिक हे महाराष्ट्राचे नवे नेते म्हणून प्रकाशात आले तर आश्चर्य मानू नये. रवी-मगळ-हर्षला-सारखे पराक्रमी ग्रह त्याना साथ देत आहेत पतप्रधान इंदिरा गाधी महाराष्ट्राच्या नेत्याचा जो शोध घेत आहेत तो शोध त्याना श्री. आदिकांच्या रूपाने लागणार आहे. भारतीय राजकारणात कांग्रेस पक्षात्री होऊ घातलेली जडण-घडण त्या पक्षाच्या दृष्टीने थोडीफार सुधारणेची ठरेल. मदीची लाट वेगाने पुढे सरकेल.

### मेष : मनाला सुखदस्पर्श

विरोधकांना नामोहरम करणारा मंगळ आठवड्याच्या शेवटी बदलणार आहे. तोपर्यंत मनात ठरवलेले बेत पुरे करून घ्या. कारण मगळ राशीस्वामी आहे. तो तुमच्या आकाक्षा व स्वप्ने निश्चित पुरी करील. सोमवार व गुरुवार तुम्हाला शुभदायक आहेत. कोणतेही नवे काम व नव्या व्यवसायाची उभारणी याच दिवशी करा. यावेळी नोकरीत बढती-बदलीचे जमावे. व्यवसायातील अवघड पेचप्रसग सहज सोडवू शकाल. लॉटरीचे तिकीट घेत नसाल तर ते या आठवड्यात अवश्य घ्या. घरात रागवू नका. मुलाना फारसे बोलू नका. उलट त्याच्या गुणाचे कौतुक करा. प्रवासाचा बेत थोडा लांबणीवर टाका. महिलानी 'ह्याच्या' मनाला त्रास होईल असे काही करू नये. मगळवारी चागल्या भोजनाचा बेत आखावा.

### वृषभ : दूरदृष्टीमुळे लाभ

अतरिक्षातील रवी-मंगळासारखे बलवत ग्रह जेव्हा विशिष्ट स्थानात येतात तेव्हा मानवी कर्तृत्वाला नेहमीच अस्मान ठेंगणे वाटते. रवी मगळाचे शत्रुस्थानी होणारे आगमन व दशमस्थानी असलेला सात्त्विक गुरू तुमचे सारे जीवन सुखमय व आनदमय करीत आहे. आता राशीतील केतूची वा दुसऱ्या शनीची अजिबात चिंता करू नका. सातवा राहू पत्नीवर ताबा चालवण्याची तुम्हाला बुद्धी देईल, पण ती आवरण्यातच खरा शहाणपणा आहे. तुम्हाला यावेळी सल्लागार खूप भेटतील. पण त्यातील हित अनहित पारखून घ्या. ही दूरदृष्टी दाखवलीत तर तुमचा या आठवड्यात निश्चितच फायदा होईल. नोकरीतच ही दृष्टी दाखवण्याची आवश्यकता भासेल. महिलानी उतावळेपणा करू नये. धीमेपणाने वागून शाबासकी मिळवावी.

### मिथुन : नवीन योजनांना वाव

तुमची मनस्थिती बरीच गुतागुतीची झाली होती याची मला कल्पना आहे. पण मला लिहायला आनद वाटतो की या आठवड्याच्या सुरुवातीलाच उत्साह आनदाचे सुखद किरण तुमच्या मनात ऐकावे लागणार आहे. काय करू आणि काय करू नको असे तुम्हाला होऊन जाईल., तब्बेत सुदृढ होईल. घरात धदा व्यवसायातील खोळवलेली कामे अडचणीवर मात करून प्रगती कडे झेप घेईल. मनातील नव्या कल्पना दृष्टीपथात येतील. अकल्पित घटनाचा या आठवड्यात अधून मधून उद्भव होईल. महिलांना नोकरीत समाधान व वरिष्ठाची सहानुभूती मिळेल.

### कर्क : प्रवासात श्रमपरिहार

सुखस्थान काहीसे जहाल बनले असल्यामुळे तुमचा स्वभाव चिडखोर व तापट बनणे स्वाभाविक आहे. मनाविरुद्ध काही घडले की, आदळआपट करणे हे तुमच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य झाले असले तरी अजून काही दिवस सहनशीलतेने काढणे आवश्यक आहे. तसा हा आठवडा फारसा वाईट नाही. या आठवड्यात थोडा दूरचा प्रवास ध्यानी मनी नसता घडेल व तुमचे मन त्या प्रवासात एकदम प्रसन्न होऊन जाईल. त्रासाने कटाळून गेला असाल तर श्रमपरिहार होईल. नोकरीत तसे वाईट नाही पण खूप दिवस मनात असलेली स्थलातराची इच्छा अकस्मात पुरी होईल. पैसा खर्चताना खिशाचा अदाज घ्या. महिलांनी खरेदी करताना हुज्जत घालू नये. सयमाने वागावे

### सिंह : थोडे धाडस करा

तूळ राशीत तृतीय स्थानी रवी-मगळाचे स्थलातर झाल्यापासूनच खरे म्हणजे सिंह राशीच्या व्यक्ती उपेक्षा सपून प्रकाशाच्या तेजोमय किरणात चमकू लागल्या आहेत. त्याचप्रमाणे गेल्या आठवड्यात तूळ राशीत अनेक समर्थ ग्रहाच्या युत्या घडून आल्या आहेत. या साऱ्या ग्रहानी तुम्हाला नवा मार्ग दाखवला आहे. उद्योगधद्याच्या नव्या नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याची जिद्द आणि कर्तृत्व तुम्हाला बहाल केले आहे. आता गरज आहे ती तुम्ही धाडस करण्याचीच. नोकरीधंद्यांत काही तरी अकल्पित लाभदायक घडावे विवाहाचा बेत तडीस जावा. अर्धवट लिखाण पुरे व्हावे. आर्थिक प्रश्न सुटून चार पैसे शिल्लक टाकू शकाल. महिलानी रविवारी मनातील काम करावे. यशसिद्धी होईल.

### कन्या : महत्त्वाकांक्षेला नवे क्षेत्र

तूळ राशीत अनेक गृहाच्या युत्या घडल्यापासून तुमची प्रतिष्ठा व स्थान प्रामुख्याने नोकरीत उचावले आहे. या आठवड्यात पहिल्या तीन चार दिवसाची काळजीपूर्वक नोंद घ्या. तुमचे हरवले गेलेले स्थान तुम्हाला पुन्हा मिळणार आहे. तुमची गरज वरिष्ठाना भासणार असून तुमची पात्रताही त्याच्या ध्यानी येईल. तुमचा एखादा दुय्यम व्यवसाय असेल तर तो

तेजीत चालू होईल. हाती घेतलेले काम किंवा तुमच्यावर सोपवलेले काम पुरे करायला तुम्हाला उत्साह वाटेल. आर्थिक परिस्थिती अजून काही काळ तरी सुधारणे कठीण. या आठवड्यात एखाद्या उच्च पदस्थ राजकीय नेत्याबरोबर तुमचा सहवास घडेल. त्याचा तुमच्या आगामी काळातील व्यवसायावर अनुकूल परिणाम घडेल. महिलांना नोकरीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळणार आहे. कामाला नवे क्षेत्र मिळेल.

## तूळ : सामर्थ्याचा साक्षात्कार

भविष्यावर विश्वास नसणारे लोकच जास्त करून भविष्य वाचतात. कारण अंतरिक्षातील ग्रहच अनुकूल वा प्रतिकूल आकार देऊन माणसाला घडवीत असतात. बाराव्या मगळाने व रवीने तुम्हाला फार सतावले. पण ते तुमच्या राशीत प्रविष्ट झाल्यापासून तुम्हाला अस्मानच ठेंगणे वाटत असेल तर नवल नाही. कारण रवी-मगळ हे सामर्थ्य देतात. तुम्हाला प्रकाश देतात. तुमचे व्यक्तिमत्त्व तेजाळून टाकतात. तुमच्या बाबतीत आता अपयशाला स्थानच नाही. नोकरी असो की व्यापारधदा असो सर्वत्र यश आणि विजय. आता पैशाची मुळीच काळजी करू नका. कुठून तरी दत्त म्हणून तुमच्या हाती पैसे पडतील कोर्टातील एखादा न्याननिवाडा तुमच्या बाजूने होईल. महिलाच्या सार्वजनिक व कलात्मक इच्छा आकाक्षा पुऱ्या होतील.

## वृश्चिक : सावधान सावधान

अॅडमिनिस्ट्रेटिव्ह धर्माची तुमची रास आहे. कुणाशी मिळवून जुळवून घेऊन काम काम करणे किंवा कुणाच्या हाताखाली काम करणे तुम्हाला आवडत नाही. अहकाराच्या या स्वभावामुळे तुम्ही आपले स्नेही, मित्र दुखावता तसाच प्रकार या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. तुम्हाला साधारण चद्रबळ आहे. पण रवी व मगळ दोन्ही ग्रह व्ययस्थानी आहेत. गरज आहे ती अत्यत सावध रहाण्याची. जामीन राहणे, कर्जात करार करणे, उसने पैसे देणे-घेणे या सर्व गोष्टी टाळावयास हव्यात. 'अभक्ष भक्षण' करून आजारास आमत्रण देऊ नका. नोकरीत गुप्त विरोधकांकडून काय चालू आहे यावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा. पैसा गरजे पुरता मिळल. महिलांनी बोलताना जीभ सैल सोडू नये. सावधगिरीने वागण्याची गरज आहे.

## धनु : यशाचे पाठबळ

तुमचे प्रगतीचे पाऊल थोडे थोडे पुढे पडत असले तरी विरोधातूनच तुम्हाला मार्ग काढावा लागत आहे व तसाच तो आणखी काही काळ काढावा लागणार आहे. कारण अजून तुमचा मार्ग निष्कटक झालेला नाही. आता तर राहूचे अत्याचारी मार्ग सुरू झाले आहेत. तब्येत सुधारत आहेच पण शरिराला काही ना काही जखमा होतच रहातील. पाय मुरगळणे, हात भाजणे असे काही तरी चालूच रहाणार आहे. म्हणून सथ राहून काम करा दांडगाई करू नका. मात्र यावेळी रवी-मगळासारखे दोन जबरदस्त ग्रह लाभस्थानी तूळ राशीत हर्शलाबरोबर सहकार्य करीत आहेत. हा आर्थिक समृद्धीचा वैभवाचा पर्वकाळ आहे एवढेच लक्षात ठेवा. व्यापारात तेजीचा फायदा. महिलानी स्टोशेगडीकडे जपून काम करावे.

## मकर : अधिकार प्राप्ती

हा आठवडा तुमच्या बाबतीत बऱ्याच काही घटना अकल्पितपणे घडवणार आहे. नोकरीतील तुमचे सामान्य स्थान एकदम सपून एखाद्या जबाबदारीच्या पदावर प्रमोशन मिळून तुम्ही आरूढ व्हाल हा धक्का तुम्हाला आश्चर्यकारक वाटेल. इजिनियर, कृषिपदवीधर, तज्ञ, वाणिज्य, पदवीधर यांना वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या मिळतील शेतीच्या व्यवसायात प्रगतीकारक पावले पडतील. तुम्ही खत कारखानदार असाल तर तुमच्या अडचणी सपणार आहेत. अभ्रक, अल्युमिनियम, हा व्यापार करणाराना नफा कमविण्याची सधी मिळणार आहे. या राशीची कुणीही व्यक्ती लहान असो वा मोठी असो या आठवड्यात समाधान व स्वास्थ्य मिळवणार आहे. राजकारण्यांना बक्षिस मिळेल. महिलांना कलाक्षेत्रात चमकण्याची सधी मिळणार आहे. नोकरीत बदलीचा योग

## कुंभ : आता चिंता नको

सध्या तुमच्या कल्याणाच्या नाड्या शनी गुरूच्याच हाती आहेत. पण गेले काही दिवस रवी-मगळाणे तुमच्या महत्त्वाकांक्षेला शह देऊन तुमच्या वाटा रोखून धरल्या होत्या. आत्ता तेच ग्रह तुम्हाला वेगाने तुमच्या ईप्सीताकडे पोचवणार आहेत. तुमच्या राजकारणातील आजवरच्या सेवेचे समाधान वाटण्यासारख चीज होईल. सत्तारूढ पक्षात असाल तर तुम्हाला बराच मोठा लाभ होईल. मत्रि, राज्यपाल किंवा याचप्रकारचे एखादे पद मिळेल. तुमची प्रतिष्ठा व अधिकार वाढतील. नोकरीत आहात त्याच ठिकाणी तुमच्या अधिकारात व मिळकतीत वाढ होईल. आता त्रास व चिंता मुळीच करू नका. इच्छापूर्तीची एकेक संधी तुम्हाला चालून येत आहे लाभ उठवा महिलानी विचार करीत बसू नये. नोकरीधद्यात त्यांचे स्वप्न साकार होईल.

## मीन : स्थावराची प्राप्ती

केंद्रस्थानी सध्या अनेक अनुकूल प्रतिकूल ग्रहाची गर्दीच गर्दी झाली आहे. हे तुमच्या स्थैर्याला व प्रामुख्याने स्वास्थाला जबरदस्त आव्हान आहे यात मुळीच शका नाही. पण त्यासाठी हातपाय गाळून बसून उपयोग नाही अडचणीवर मात करण्याएवढी विचारशक्ती तुम्हाला परमेश्वराने दिली आहे. सावध राहा व लाभ करून घ्या. या आठवड्यात तुम्हाला वारसदारीतील स्थावर मिळकत मिळू शकेल. पैसाही मिळू शकेल. नोकरीत काही मनासारखे घडले नाही तर त्रास मात्र होणार नाही. वरिष्ठाकडून सहानुभूती मिळेल. तुम्ही नव्या उद्योगाच्या फदात न पडणे बरे. हवी ती साधने उपलब्ध होणे अवघड होईल. घराचा प्रश्न सुटेल गरजेपुरता पैसा मिळेल. महिलानी आपल्या नोकरी-उद्योगात थोडे कसब दाखवावे. त्याचा उपयोग होईल. □


श्रीशब्द प्रकाशन : कविता

**॥ कल्लोळ ॥**

**चंद्रकांत कल्लोळी**

मूल्य : रु. ३।–

संपर्क : अनिल किणीकर

१६९१ सदाशिव पुणे ३०.

नजर । ह. शि. खरात

# अमेरिकन चित्रपट मुके परंतु विलक्षण बोलके

अमेरिकन सांस्कृतिक केंद्राने परवा एक संस्मरणीय चित्रपट महोत्सव साजरा केला. अमेरिकन मूकचित्रपट जमान्याच्या काळातील जतन करून ठेवलेले काही अभिजात असे मूक चित्रपट ह्या महोत्सवात दाखविण्यात आले. अमेरिकन चित्रपट इतिहासाच्या सुरुवातीच्या काळातील हे चित्रपट होते. ह्यावेळी अमेरिकन चित्रपट तंत्र ह्या दृष्टीने बोलका नव्हता. इतर काही तांत्रिक बाबींच्या दृष्टीने तो अपरिपक्व असा होता. कॅमेरा हा ओळखीचा झाला होता परंतु पडद्यावरही कॅमेरा काही खेळ करू शकतो ही कल्पना त्याकाळी इंग्लंडमध्ये जेवढी रुजली होती तेवढी अमेरिकेत नव्हती. हळूहळू ती इंग्लंडमधून अमेरिकेत आली. परंतु सुरुवातीच्या काळात देखील म्हणजे तांत्रिक बाबतीत व कॅमेरा हे माध्यम म्हणून कल्पना नसताही अमेरिकन मूक चित्रपट अभिजात निघावेत हे खरोखरीच लक्षणीय आहे. विशेषतः सेटिंग, मेकअप, आऊटडोअर शूटिंग ह्या बाबतीत सहाजिकच अमेरिकन चित्रपट प्रथमावस्थेत होता. कॅमेऱ्याच्या बाबतीत तर तो फारच बालबोध होता. अशा काळातदेखील म्हणजे १९०३ सालापासून १९२० सालापर्यंतचे अमेरिकन मूक चित्रपट पाहिले तर १९७४ सालीही ते आपल्याला ' अपिल ' होतात वढेच नव्हे तर खिळवून ठेवतात हे त्या चित्रपटाचे मोठेपण असल्याशिवाय नाही. १९०३ सालची स्लॅपस्टिक कॉमेडी आपल्याला आजही पोट धरून हसायला लावते, तिच्यातील विनोद वा युक्त्या प्रयुक्त्या आजही ताज्या वाटाव्यात ह्या गोष्टी पाहिल्या व आजच्या बोलक्या जमान्यातील केविलवाणा विनोद पाहिला किंवा जुन्याच कल्पनाचं चऱ्हाट पुन्हा पुनः पाहिले की अमेरिकन मूक चित्रपटातील अभिजातता प्रत्ययास आल्यावाचून राहात नाही. अशा प्राथमिक अवस्थेतच पोर्टर, मॅक सेनेट व चार्ली चॅप्लीन सारखे महान कलाकार निर्माण व्हावेत म्हणजे आधी कळस मग पाया सारखीच अवस्था होय. विशेषतः चर्ली चॅप्लीनचे मूक चित्रपट आजच्या काळात तांत्रिक बाजू सोडल्या तर उच्च कलात्मक दर्जाचे वाटतात. विशेषतः लोकांना हसवीत मानवी मूलभूत दुःखांना स्पर्श करणारी त्याची प्रतिभा ही त्याच्या सम तीच होय. मानवी स्वभावाचे त्याचे विलक्षण निरीक्षण, दुःखाची अपार जाण व विनोद निर्मितीसाठी लागणारे अफलातून डोके हे पाहिल्यावर निदान कॉमेडीमध्ये तरी चार्ली चॅप्लीनचा हात अजूनही कोणी धरू शकत नाही. म्हणून चॅप्लीन हा नेहमीच आपल्या दुःखात्मक वा शोकात्मक शेवटामुळे किंवा संबंध चित्रपटातील दुःखात्मक प्रकृतीमुळे शेवटी प्रेक्षकांची सहानुभूती मिळवीत असल्याने मला थोडासा दुर्बल वाटत असला तरी कॉमेडी चित्रपटाच्या दुनियेत ' चॅप्लीन झालासे कळस ' हे कुणालाही मान्य होईल.

अमेरिकन सांस्कृतिक केंद्रातर्फे साजऱ्या झालेल्या चार दिवसांच्या ह्या मूक चित्रपट महोत्सवावात छोटे छोटे असे अठरा चित्रपट दाखविण्यात आले. हे दाखविताना १९०३ पासून मूक चित्रपट कसा कसा प्रगत होत गेला हे जाणवते. त्याचप्रमाणे वर्तमानकालीन चित्रपटाच्या अनेक प्रकारांचे मूळही त्यात सापडते. सध्याच्या अत्यंत प्रशांत अशा तांत्रिक काळातील ट्रेन रॉबरी, कॉमेडी, फॅन्टसी, वेस्टर्न, असे चित्रपट पाहिले की पोर्टरचे ग्रेट ट्रेन रॉबरी, ड्रीम ऑफ ए रेअरबिट फिड, मॅकसेनेटचे क्लेव्हरडमी, अॅस्ट्रे फ्रॉम द स्टीअरएज, ग्रिफीथचे कॉर्नर इन व्हीट, न्यूयॉर्क हॅट, चॅप्लीनचे ट्रॅम्प, बॅंक तर हार्टचा टॉलगेट हे मुके परंतु विलक्षण बोलके चित्रपट किती अभिजात होते हे जाणवते.

### एडविन पोर्टर आणि मॅक सेनेट

यूरोपातील काही मूक चित्रपट बघून एडविन पोर्टरने द लाईफ ऑफ अमेरिकन फायरमन हा १९०३ साली चित्रपट काढला. असे अनेक चित्रपट यूरोपात काढले जात परंतु पोर्टरने प्रथमच फायरमन स्वतःच्या बायकोस व मुलास कसे वाचवितो हे दाखविले असून सुरुवातीलाच स्वप्नदृश्यासाठी डब्बल एक्सपोजर वापरला आहे. परंतु त्याने काढलेला ' द ग्रेट ट्रेन रॉबरी ' हा चित्रपट रोमांचित असून त्याकाळी अत्यंत सणसणीत वाटला. प्रथमतःच ह्या चित्रपटात कॅमेऱ्याचा जाणीवपूर्वक वापर आढळतो. ह्या चित्रपटातील ' शांत ' धावती आगगाडी पाहणे किंवा घोडदौड बघणे हा वेगळाच अनुभव आहे. कधी कधी तर धावत्या गाडीच्या मागे कॅमेरा वेगवान झालेला आढळतो. मूक चित्रपट असूनही पिस्तुलांच्या आवाजाने इथे घोडी बिथरलेली व चमकलेली आढळतात. म्हणजे चित्रपट मूक असूनही पिस्तुलाची आवाजी काढली आहे. परंतु ह्या चित्रपटापेक्षाही पोर्टरचा ' द ड्रीम ऑफ ए रेअर बिट फिड ' हा भलताच फॅन्टास्टिक वाटला. १९०६ सालातील हा चित्रपट म्हणजे तंत्र म्हणून कॅमेऱ्याच्या ज्या युक्त्या-प्रयुक्त्या वापरल्या जात त्याची सुरुवात आहे. परंतु ह्या चित्रपटातील दिग्दर्शकाने निर्माण केलेली फॅन्टसी ही फार महत्त्वाची आहे. पोर्टरने येथे स्टॉप-मोशन चित्रणाचा वापर केला असून येथे त्याच्या प्रतिभेने कळस केला आहे. खूप दारू प्यायला. नंतर एका दारूड्याच्या मनातील विश्व चितारण्याचा हा प्रयत्न फारच

छान असून रस्त्यावरील खाब बससारखा पळणे, किंवा पलग उडून जाणे ह्या कल्पना चागल्या आहेत. हा चित्रपट आजही प्रेक्षकाना सतत हसवितो.

मॅक सेनेट हा स्लॅपस्टिक कॉमेडीचा जनक. स्लॅपस्टिक कॉमेडीत फार्सिकल अभिनय, पॅन्टोमाइम व सर्कस हे घटक प्रामुख्याने आढळतात. स्लॅपस्टिक कॉमेडी ही खऱ्या अर्थाने कॉमेडी असते. तिथे घटना, स्वभावचित्रण वा संवादाला फारसे महत्त्व नसते. तेथे तर्कशास्त्र वापरले जात नाही तर ती अती वास्तवतेकडे झुकलेली असते. सेनेटचा 'क्लेव्हर डमी' हा १९१७ सालचा चित्रपट अफलातून आहे. ह्या चित्रपटातील बेन टरपीनचे काम म्हणजे चॅर्ली चॅप्लीनची प्रथमावस्था होय.कधी कधी तो चॅप्लीनलासुद्धा 'ओव्हर टेक' करतो. चॅप्लीनचा तो अभिनयाच्या बाबतीत गुरू शोभावा. आपले जिच्यावर प्रेम आहे ती स्त्री मिळावी म्हणून बेन टरपीन एका यांत्रिक बमीची जागा घेतो आणि त्यामुळे जे हास्यस्फोटक प्रसग घडतात त्याचे हे चित्रण आहे. परंतु 'डमी'चे नाटक उघडकीस येते आणि पाठलागची धमाल सुरू होते. 'पाठलाग' करीत असताना विनोद निर्मिती करणे हे सेनेटचे वैशिष्टय. मग त्यात फटफटी, मोटार येते आणि भिंतीमधूनही हा पाठलाग सुरू होतो. बेन टरपीनने अशा अनेक धमाल चित्रपटात कामे केली आहेत. तो आपल्या अनुभवाबद्दल एके ठिकाणी म्हणतो, 'मी बऱ्याच वेळा आदळलोय, धडका मारल्यात, २० पिंप भरतील एवढया बशा फोडल्यात, स्टोव्हची वाट लावलीय, फर्निचरची मोडतोड केलीय आणि स्वत:च्या हातापायाचीही दैना करून घेतली' चॅप्लीन पडद्यावर आल्यावर बेन टरपीनचा अस्त झाला. परंतु अजूनही काही बाबतीत चॅप्लीनपेक्षा तो मोठा वाटतो. कारण चॅप्लीनसारखे सहानुभूतीचे हत्यार त्याने वापरले नाही.

### चॅपलीन झालासे कळस

चॅपलीनचे युग येण्याआधी ग्रिफिथ ह्याने अमेरिकन मूक चित्रपटात आपले स्थान सामाजिक समस्या हाताळून निर्माण केले होते. सामाजिक समस्या हाताळताना, कोठेही प्रचार न आणता वास्तव पातळीवरून त्याने काही प्रसगाचे हृद्य चित्रण केले असून काही शॉटस् अस्वस्थ केल्याशिवाय राहात नाहीत. विशेषत: दुष्काळाचे चित्रण करताना त्याचे 'लोनली व्हिला' आणि 'कॉर्नर इनव्हीट' हे चित्रपट लक्षात रहातात. परतु 'न्यूयॉर्क हॅट' हा चित्रपट अनेक बाबतीत श्रेष्ठ वाटतो. एका लहान गरीब मुलीला फुलांची हॅट हवी असते. परतु दारिद्रयामुळे तिला ती घेता येत नाही. एक पाद्री तिला ती घेऊन देतो. परतु गावातील बायका गैरसमज पसरवतात. अर्थात शेवट गोड होतो. ह्या चित्रपटातील लहान मुलीचे काम उत्कृष्ट असून तिच्या चेहऱ्यावरील दु:ख अत्यंत बोलके आहे. चॅपलीन नतर व त्याच दरम्यान वेस्टर्न चित्रपटातील 'काऊ बॉय'चा मूळ जनक व पहिला काऊबॉय म्हणून विल्यियम हार्ट आपल्या लक्षात रहातो. 'वेस्टर्न' चित्रपटाचे प्राथमिक स्वरूप व आताचे प्रगल्भ स्वरूप पाहिल्यावर हार्टची कामगिरी मोठी वाटते.

ह्या साऱ्या मूक चित्रपटाच्या जमान्यात चॅर्ली चॅप्लीनने आपले स्थान अजरामर करून ठेवले. चॅप्लीनच्या चित्रपटातील कॉमेडी, स्लॅपस्टिक कॉमेडी, टेकिंग, कॅमेऱ्याचा उपयोग व मानवी मूलभूत दु:खाला त्याने फोडलेली वाचा, त्याचा उच्च दर्जाचा अभिनय ह्या साऱ्या गोष्टीनी त्याचे मूक चित्रपट अमर झाले आहेत. खरे म्हणजे चॅर्ली चॅप्लीन व त्याचे चित्रपट हा स्वतत्र लेखाचा विषय आहे. तो थोडक्यात आटोपता येणारा विषय नाही. अमेरिकन मूक चित्रपट महोत्सवात चॅप्लीनचे ट्रॅम्प, वूमन, बँक व पोलीस हे चार मूक चित्रपट दाखविण्यात आले. त्यापैकी ट्रॅम्प आणि बँक हे चित्रपट अत्यंत उत्कृष्ट असून विलक्षण बोलके आहेत. ट्रॅम्पपेक्षाही बँक हा चित्रपट मला फार आवडला. बँक मध्ये शिपायाची नोकरी करणारा एक सामान्य गरीब माणूस बँकेतील एका टायपिस्टवर प्रेम करतो. परंतु वास्तवात त्याच्या नशिबी शोकांतिका येते. आणि हाच दु:खाचा सूर आपल्याला चॅप्लीनच्या साऱ्या चित्रपटात आढळतो. 'बँक' चित्रपटात दाखविलेले स्वप्न चॅप्लीनच्या प्रतिभेचा अत्युच्च बिंदू आहे. हे चित्रपट बघताना चॅप्लीन स्लॅपस्टिक कॉमेडीचे अनेक प्रकार अशा तऱ्हेने हाताळतो की, त्याच्या तोडीचा कुणीही दिग्दर्शक आजही आढळत नाही. 'ट्रॅम्प'मध्ये ही अशाच तऱ्हेची कथा आहे. पोलीस व वूमन ह्या चित्रपटातही चॅप्लीन अशीच धमाल करतो. त्याच्या विनोदी आयडियबाज डोक्याचे अनेक उन्मेष आपल्याला एक वरच्या दर्जाचा आनद देतात. चॅप्लीन हा सहानुभूती बळकावतो हा दोष सोडला तर त्याचे चित्रपट पहाताना आपण आपल्या आयुष्यातला फार मोठा आनद उपभोगतो आहोत ही जाणीव येते. हा आनद इतर सुखांच्या मानाने फार श्रेष्ठ असून चॅप्लीनचे चित्रपट न पहाणे म्हणजे आयुष्यातली फार मोठी गोष्ट मुकणे होय. मी तर असे म्हणेन की चॅप्लीनचे चित्रपट ज्याने पाहिले नाहीत त्याने आपले आयुष्य फुकट घालविले. आयुष्यात एकदा तरी चॅप्लीन बघावा इतका तो 'ग्रेट' आहे. □

राजहंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. श्री. ग. माजगावकर

तुम्हाला पालेकरांची चित्रे आवडोत न आवडोत
त्या दांपत्याचा अभिनय तुम्हाला पटो न पटो
मुंबईच्या सांस्कृतिक जीवनामध्ये पालेकरांची दखल तुम्हाला घ्यावीच लागते.
कारण पालेकर जोडपे जगत असते.
जे जे करायचे ते तीव्रपणे रसरसून करायचे हा त्यांचा स्वभाव.
मग ते चित्र असो : नाटक असो :
सेन्सॉर बोर्डाबरोबर चाललेला वाद असो :
मैत्री असो : भांडण असो.

## नाटकवाले दोन पालेकर

पुष्पा भावे

**माणूस**
**दिवाळी अंक**

एखाद्या मातीत विषय जितका खोलवर रुजलेला असतो
तितका तो मातीच्या लांबच्या माणसांनासुद्धा
अपील होण्याची शक्यता जास्त असते.
अशा विषयावरचा चित्रपट
भाषा ओलांडून, पलिकडे जातो.
'झोर्बा द ग्रीक', बायसिकल थीव्हज, निर्माल्यम्
हे चित्रपट पाहताना मी काही दूरचे पाहत आहे असे वाटतच नाही.
ते अगदी फार जवळचे वाटू लागते.
'निर्माल्यम्' मला माझा वाटला.
त्यानं मला डिस्टर्ब करून टाकल.

## निर्माल्यम् : माझा आवडता चित्रपट : विजय तेंडुलकर

शब्दांकन : अशोक जैन

**माणूस**
**दिवाळी अंक**